संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १९.१०.२०२४ | अंक नं. १९५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020






Hero GIFT
Grand Indian Festival of Trust

तडजोड नाही,
फक्त नवीन HF-Deluxe

फेस्टिव्ह एक्स शोरूम किंमत*
~~₹69,868*~~ ₹64,868*
(₹4000* कॅश डिस्काउंट सोबत)

कमी डाउन पेमेंट ₹1999* | EMI ₹3999* | व्याजदर 5.99%* | निवडक काईसवर कॅशबॅक ₹5000* | 98980 51581


## ॥ भावपुर्ण श्रद्धांजली ॥

तुमचा सहवास आणि मार्गदर्शन आमच्या जीवनाची झालर होती,
आमच्या जीवनात तुमची साथ आम्हाला हवी हवी होती...!




**स्व. हरिभाऊ पिराजी फुलसौंदर**
विश्वस्त - श्री विशाल गणपती मंदिर देवस्थान ट्रस्ट
स्व.दि. १२/१०/२०२४

शोकाकुल

**माळीवाडा पंच मंडळ देवस्थान धर्मफंड, ट्रस्ट**
**सर्व विश्वस्त मंडळ**
अहिल्यानगर


49 वर्षांची वैभवशाली परंपरा
शुद्ध शाकाहारी बेकरी पदार्थांचे निर्माते
NEW PRABHAT FOODS SINCE 1975 "WE BAKE HAPPINESS"
न्यु प्रभात फुडस्
शिवकुस बिल्डींग, चितळेरोड, अहमदनगर.
मो. 7769830030


## ॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



"आता सहवास जरी नसला तरी स्मृति सुगंध देत राहील,जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील."

**कै. दिलीपभाऊ बद्रीनारायण शिंदे**

रविवार दि. २०/१०/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. प्रथम वर्षश्राध्द करण्याचे योजिले आहे. तरी सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे

शोकाकुल

श्रीमती.विजया दिलीपराव शिंदे (पत्नी) श्री.युवराज दिलीपराव शिंदे (मुलगा)

श्री.राजेंद्र बद्रीनारायण शिंदे (भाऊ)
श्री.शरद एकनाथ शिंदे (भाऊ)
श्री.हरिष शरद शिंदे (पुतणे)
श्री.अनिकेत संजय शिंदे (पुतणे)
चि.सचिन शरद शिंदे (पुतणे)
चि.विराज शिवाजी शिंदे (पुतणे)
चि.यशराज शिवाजी शिंदे (पुतणे)
श्री.राजेंद्र लक्ष्मणराव चौधरी (भाऊ)
सौ.पद्मा चांगदेव डुबेपाटील (बहीण)
श्री.शिवाजी बद्रीनारायण शिंदे (भाऊ)
श्री.संजय जगन्नाथ शिंदे (भाऊ)
श्री.शिवाजी साहेबराव शिंदे (भाऊ)
श्री.पारितोष अजय शिंदे (पुतणे)
श्री.आशितोष अजय शिंदे (पुतणे)
चि.आशिष संजय शिंदे (पुतणे)
कु. अनुश्री राजेंद्र शिंदे (पुतणी)
श्री. गणेश मोहनराव सावंत (मेव्हणे)
सौ.साधना अरुणराव सुपेकर (बहीण)
चि.राजवीर युवराज शिंदे (नातु)

टिप: श्री.ह.भ.प.पूज्य गुरुवर्य रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोके (नागपूरकर) यांचे सकाळी १० ते १२ वाजता किर्तन होईल.

मार्गदर्शक: श्री.ह. भ.प. रविंद्र महाराज आव्हाड वडुलेकर
किर्तनसेवा सहभाग : भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज रायकर
(अध्यक्ष: भक्ती वेदांत गुरुकुल पिंपळगांव ,माळवी)
स्थळ: महालक्ष्मी लॉन्स, अनुसयानगर , शिंदे मळा, नगर- कल्याण रोड, अहिल्यानगर




संकष्ट चतुर्थी उपवासासाठी स्पेशल
टक्कर
रवीवार दि.२० ऑक्टोबर चंद्रोदय ०८.२७ मी.
काजु- पॅटीस, शाबुदाणा वडा,
कैलास उडपी
उपवासाची स्पेशल मलाई लस्सी
शिवशक्ती अर्पाटमेंट, खिस्त गल्ली,अ.नगर

भाड्याने पाहिजे
अहिल्यानगर मध्ये
3/4 BHK
फ्लॅट/बंगला
भाड्याने पाहिजे
संपर्क
7588033111



तुम्ही ॲलर्जीने त्रस्त आहात का?

वारंवार होणारी सर्दी, खोकला व दमा विकार
शरीरावर लाल चट्टे येऊन अंग सुजणे व खाज येणे.
ॲलर्जी कमी करण्यासाठी औषधे घ्यावी लागणे.
नेहमी डोळ्यांना खाज सुटणे व डोळे लाल होणे.

कोणत्याही वयातील रुग्णांसाठी वरील व्याधींवर आता खात्रीशीर निदान व उपचारासाठी नगर जिल्ह्यातील एकमेव परिपूर्ण असे
"अहमदनगर ॲलर्जी टेस्टींग सेंटर"
डॉ. कृष्णा बलदवा
(एम.बी.बी.एस.) ॲलर्जी–त्वचारोग, दमा व मधुमेह तज्ञ
-:नवीन पत्ता:-
जुने वाळिंबे हॉस्पिटल, वर्धमान टायर समोर, बांबु गल्ली, धरती चौक, अ.नगर
Mo. 8390907414 / 9422227414
सोमवार ते शनिवार ※ वेळ : स. १० ते २:३० सायं. ६ ते ९. पर्यंत
रविवार ※ वेळ : स. १० ते दु. १ पर्यंत

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA KERAKOLL CARYSIL colortile RAK NIRALI TIMEX ICON





अनुभूती नाविन्याची, परंपरा शाही वस्त्रांची !

आयुष्यातील प्रत्येक शुभप्रसंगी वस्त्ररुपात आम्ही असतो तुमच्या परिवारा सोबत !



₹ 2000, ₹ 5000, ₹ 10000 च्या खरेदीवर
हमखास बक्षीस मिळवा.
Call - 0241-2325002/3/4

पेशवाई श्रीमंत
सर्जेपुरा, अहिल्या नगर.
www.peshwaishrimant.com
/peshwaishrimant

पैठणी ※ पारंपारिक सारिज ※ डिझायनर सारिज ※ घागरा ※ ब्रँडेड रेडीमेड्स ※ सूटिंग ※ शर्टिंग ※ एथेनिक ※ ॲक्सेसरीज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## वैज्ञानिक सर्वोच्च प्रगती परमरुद्र...महासंगणक

१९९१ मध्ये सी डॅक मध्ये 'परम' हा पहिला भारतीय महासंगणक तयार झाला. विविध सूक्ष्म व मोठी समस्या, प्रश्न सोडवण्यास, कृत्रिम बुद्धिमत्ता व माहिती, आकडेवारीच्या पृथक्करणासाठी या महासंगणकाची आवश्यकता असते. त्यासाठीच २०१५ मध्ये नवे राष्ट्रीय महासंगणक धोरण जाहीर झाले.

महासंगणकीय तंत्रज्ञान हे राष्ट्रीय सुरक्षासह, विज्ञान, उद्योग व सामाजिक क्षेत्रात क्रांती आणू शकते. काही दिवसांपूर्वी पंतप्रधानांनी राष्ट्रीय सुपर कॉम्प्युटिंग मिशन अंतर्गत स्वदेशीच विकसित केलेले ३ परम, रुद्र महासंगणक देशार्पण केले.

१३० कोटी खर्चून तयार केलेले हे ३ महासंगणक पुणे, दिल्ली, कोलकत्ता येथे अग्रेसर वैज्ञानिक संशोधनासाठी तैनात होत आहेत. पुण्यातील जायंट मीटर रेडिओ टेलिस्कोप फास्ट रेडिओ बर्स्टस् व इतर खगोलीय घटनांचा शोध घेण्यासाठी या सुपर संगणकाचा उपयोग होईल.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१




अमेरिकेने आपणास सुपर कॉम्प्युटर देण्यास नकार दिल्यावर पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या नेतृत्वात सीडॅकच्या शास्त्रज्ञांनी हे अभिमानास्पद यश मिळवले आहे.

प्रगतीची घोडदौड करणाऱ्या आपल्या देशाच्या आर्थिक, सामाजिक, वैज्ञानिक ताकदीसह ही परम संगणक आंतरराष्ट्रीय शक्तीही सिद्ध करतात.

# विधानसभा निवडणुकीसाठी माजी महापौर संदीप कोतकर यांची अहिल्यानगर जिल्हाबंदी २० ऑक्टोबर ते १ डिसेंबरपर्यंत शिथिल



नगर - विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वतः किंवा पत्नीच्या उमेदवारी व प्रचारासाठी माजी महापौर संदीप कोतकर यांची जिल्हाबंदी २० ऑक्टोबर ते १ डिसेंबर या कालावधीसाठी शिथिल करण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण व रेवती मोहिते डेरे यांनी शुक्रवारी (दि.१८) हे आदेश दिले आहेत.

माजी महापौर कोतकर हे निवडणुकीत उमेदवारी करण्याच्या तयारीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडे त्यांनी उमेदवारीची मागणी केलेली आहे. ते स्वतः किंवा त्यांच्या पत्नी माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर निवडणूक लढवणार असल्याचे गुरुवारीच (दि.१७) सचिन कोतकर यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, संदीप कोतकर यांची जिल्हाबंदी कायम असल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केला होता. त्यावर सुनावणी होऊन न्यायालयाने शुक्रवारी त्यांची जिल्हा बंदी निवडणूक कालावधीत शिथिल केली.

२० ऑक्टोबर ते १ डिसेंबर यादरम्यान संदीप कोतकर यांना जिल्ह्यात प्रवेश करता येणार आहे. मात्र त्यांना दर सोमवारी सकाळी ८ ते १० या वेळेत कोतवाली पोलिस ठाण्यात हजेरी देण्याचेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, केडगाव हत्याकांडातही संदीप कोतकर हे आरोपी असून या गुन्ह्यातील जिल्हाबंदीची अट शिथिल करण्यासाठी त्यांनी नगरच्या जिल्हा न्यायालयात अर्ज केला आहे. त्यावर २२ ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. जिल्हा न्यायालयाच्या निर्णयानंतरच त्यांना जिल्ह्यात प्रवेश करता येणार आहे.

### कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील दिशा ठरवू : संदीप कोतकर

दरम्यान उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर माजी महापौर संदीप कोतकर यांच्याशी संपर्क साधून विधानसभा निवडणुकीबाबत पुढील दिशा काय याबाबत विचारणा केली असता न्यायालयीन सर्व प्रक्रिया पूर्ण होवू द्या. नगरमध्ये आल्यावर सर्व कार्यकर्ते, मार्गदर्शक तसेच ज्येष्ठांशी चर्चा करून पुढील दिशा ठरविली जाईल असे कोतकर यांनी सांगितले. निवडणुकीसाठी कोणत्या पक्षाकडे उमेदवारी मागायची की अपक्ष लढायचे हे ही सर्वांशी चर्चा करून ठरवू असे त्यांनी सांगत पुढील सस्पेंस कायम ठेवला आहे.

# मैत्रिणीकडे जाते असे सांगून गेलेली तरुणी झाली बेपत्ता

नगर - मैत्रिणीकडे जावून येते असे सांगून घरातून गेलेली १६ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना बोल्हेगाव उपनगरात गुरुवारी (दि.१७) दुपारी घडली आहे. तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय तिच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.

याबाबत सदर तरुणीच्या आईने शुक्रवारी (दि.१८) तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुरुवारी दुपारी ती तरुणी व तिची लहान बहिण या दोघी घरी असताना तिने लहान बहिणीला आपण मैत्रिणी कडे जावून येते असे सांगितले. त्यानंतर ती घराबाहेर पडली परंतु सायंकाळपर्यंत घरी परतली नाही. त्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध सुरु केला. परंतु तिची काहीही माहिती मिळाली नाही. त्यानंतर तिच्या आईने शुक्रवारी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.




रस्त्यावर उघड्या असलेल्या गटारींमुळे नागरिकांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे. (छाया - धनेश कटारिया)

# रस्त्यावरील उघड्या गटारींमुळे नागरिकांच्या जिवाला धोका

**तक्रारींकडे महापालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष**

नगर - येथील कराचीवालानगर येथे नुकतेच रस्त्याचे काम झाले असून त्या भागातील गटारी उघड्यावर असल्याने नागरिकांचे आरोग्यासह जीव धोक्यात आले आहे. रात्रीच्या वेळी या परिसरामध्ये अंधार असल्याने लहान मुले व वय वृद्ध लोकांचे जीव धोक्यात आले असून त्यांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.

शहरामध्ये गोचीड ताप, डेंग्यू, चिकनगुनिया असे अनेक आजार मोठ्या प्रमाणावर पसरले आहेत. याबाबत परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा महानगरपालिकेत तक्रार केली असून याबाबत संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्यांना वारंवार कळूनही अद्याप कोणतीही उपाययोजना महापालिकेकडून करण्यात आलेली नाही सदर बाबीकडे तत्काळ लक्ष देऊन या उघड्या गटारी बंद करण्यात यावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# उड्डाणपुलावरील अपघाती वळणासंदर्भात परिवहन विभागाने केलेल्या सूचनांकडे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे 'दुर्लक्ष'




नगर - शहरातील उड्डाणपुलावर चांदणी चौक भागातील धोकादायक वळणावर वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत परिवहन विभागाने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाला ऑगस्ट महिन्यामध्ये पत्राद्वारे महत्त्वपूर्ण सूचना केल्या होत्या. मात्र त्याकडे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचे शुक्रवारी मध्यरात्री त्याच अपघाती वळणावर झालेल्या अपघातामुळे स्पष्ट होत आहे. २५ सप्टेंबर रोजी हॉटेल यश पॅलेस समोरील उड्डाणपुलावर अपघाती वळणाचा अंदाज न आल्याने ताबा सुटल्याने कारला अपघात झाला होता. त्यात रमेश भागीनाथ नवपुते नामक कारचालकाचे निधन झाले होते. पुढे अपघाती वळण आहे हे वाहन चालकांच्या लक्षात येत नसल्याने त्या उड्डाणपुलावरील त्या धोकादायक वळणावर वारंवार अपघात होत आहेत.

परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक विनायक साखरे व स्मिता कोले यांनी उड्डाणपुलावरील अपघाती वळणाची समक्ष पाहणी करून त्याबाबतचा अहवाल ऑगस्ट महीन्यात वरिष्ठांना सादर केला होता.

त्या अहवालानुसार प्राधिकरणाला सुचविण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण उपाय योजनांमध्ये प्रामुख्याने उड्डाणपुलावरील त्या धोकादायक वळणाच्या सुरुवातीलाच वेग मर्यादेबाबतचे फलक ठळकपणे लावण्यात यावेत. तीव्र अपघाती वळणाच्या ठिकाणी काँक्रीटच्या संरक्षक भिंतीची शक्य तेवढी उंची वाढविण्यात यावी, वळण धोकादायक असल्याचे फलक व ब्लिंकिंग ॲरो लावण्यात यावेत, पुढे अपघात स्थळ व धोकादायक वळण असल्याचे फलक ठळक स्वरूपात लावण्यात यावेत, वाहनांचा वेग कमी करण्याच्या दृष्टीने तीव्र वळणाच्या २०० मीटर आधी रम्बलर स्ट्रीप लावण्यात याव्यात.

तसेच पूर्ण उड्डाणपुलावर कॅट आईज व ब्लिंकर्स लावण्यात यावेत. त्याचबरोबर वारंवार होणारे अपघात रोखण्याच्या दृष्टीने तांत्रिकदृष्ट्या यथायोग्य अन्य उपाययोजना तात्काळ करण्यात याव्यात अशा सुचना प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांकडे पत्राद्वारे केल्या होत्या. या अपघातांबाबत अभय ललवाणी यांनी जिल्हाधिकारी व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना ई - मेल द्वारे पत्र पाठवून लक्ष वेधले होते.

मात्र राजमार्ग प्राधिकरणाने उड्डाणपुलावर जुजबी उपाययोजना केल्या असून पुढे अपघाती वळण आहे. वाहने सावकाश चालवा. असे फलक अजूनही उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला दिसून येत नाहीत. वाहन चालकांचे रस्ता संमोहन टाळण्यासाठी तसेच लक्ष वेधण्यासाठी ठळक असे ब्लिंकिंग ॲरो, सोलर ब्लिंकिंग रोड स्टडस दिसून येत नाहीत. पुढे अपघाती वळण आहे हे उड्डाणपुलावर प्रवेश करताच वाहनचालकांच्या लक्षात यावे यासाठी ठळक व स्पष्ट फलक बसवणे अत्यंत आवश्यक आहे.

त्या दृष्टीने तातडीने उपाययोजना व्हाव्यात अशी मागणी वाहन चालकांमधून होत आहे.

# नगरमध्ये युवकाला रस्त्यात अडवून धारदार हत्याराने केले वार

### तिघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर - शहरात रस्त्याने पायी चाललेल्या युवकाला मोटारसायकल आडवी लावून शिवीगाळ करत त्याच्यावर धारदार हत्याराने वार करून त्याला जखमी केल्याची घटना शुक्रवारी (दि.१८) दुपारी १२.३० च्या सुमारास शहरातील ब्राम्हणगल्ली, बारातोटी कारंजा जवळ घडली.

आयान जावेद शेख (वय १७, रा. जुना मंगळवार बाजार, खाटीक गल्ली, नगर) असे जखमी तरुणाचे नाव असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्याने उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी शेख आसद अख्तर, शेख उनेस आबीद, शेख आख्तर महेबूब (सर्व रा.जुना मंगळवार बाजार, खाटीक गल्ली, नगर) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



धारदार हत्याराने वार केल्याने जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेला जखमी युवक. (छाया - बबलू शेख)

जखमी आयान याचे वडील अब्दुल कादर हुसेन हे बूथ हॉस्पीटलमध्ये १५ ऑक्टोबर पासून उपचार घेत आहेत. त्यांना मेडिकल मधून औषध आणण्यासाठी आयान हा शुक्रवारी दुपारी विशाल एजन्सी येथे पायी जात होता. ब्राम्हणगल्ली, बारातोटी कारंजा जवळ शेख आसद अख्तर, शेख उनेस आबीद हे दोघे मोटारसायकल वर आले आणि त्याला आडवी लावत शिवीगाळ केली. त्याने शिवीगाळ का करता असे विचारले असता आसद याने आयान याच्या डाव्या हातावर धारदार वस्तूने चार ठिकाणी वार केले व तो खाली पडल्यावर दोघे तेथून पळून गेले.

त्यानंतर तेथील ओळखीच्या माणसांनी कोतवाली पोलीस स्टेशन व तेथून उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात नेले. त्यानंतर शेख आख्तर महेबूब हा त्यांच्या घरी गेला त्यावेळी घरात फक्त महिला होत्या. त्याने त्यांना शिवीगाळ करून आमच्यावर केस करू नका नाहीतर वाईट परिणाम होतील अशी धमकी दिली असल्याचे जखमी आयान याने जबाबात म्हंटले आहे. या जबाबावरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



## मेहेरबाबा नवजीवन पदयात्रेचे गाडे परिवारातर्फे स्वागत

मेहेरबाबा नवजीवन पदयात्रेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त नगर ते मेहेराबाद पदयात्रा काढण्यात आली. तिचे गाडे परिवाराच्या वतीने यश पॅलेस येथे स्वागत करताना नगरसेवक योगीराज गाडे.

## मोटारसायकलवरून पडून वृद्धेचा मृत्यू

नगर - नातवासोबत मोटारसायकल वर चाललेल्या वृद्धेला चक्कर आल्याने ती मोटारसायकलवरून रस्त्यावर पडून गंभीर जखमी होत मयत झाल्याची घटना नगर तालुक्यातील जेऊर येथे शुक्रवारी (दि.१८) सकाळी १०.३० च्या सुमारास घडली. हौसाबाई चंद्रकांत वाघमारे (वय ७०, रा. जेऊर बायजाबाई, ता.नगर) असे या मयत महिलेचे नाव आहे. सदर महिला तिचा नातू साहिल सुरेश वाघमारे याच्या सोबत मोटारसायकल वर जात असताना तिला अचानक चक्कर आली आणि ती खाली रस्त्यावर पडली. नातवाने तिला तातडीने रुग्णवाहिका बोलावून उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.ज्योती शिंदे यांनी त्यांची तपासणी करून त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत ची खबर एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# विजेच्या शटडाउनमुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरास एक दिवस विलंबाने पाणीपुरवठा होणार

नगर - महावितरण कंपनीला ट्री कटिंग तसेच बाकीचे देखभाल व दुरूस्तीचे काम करण्यासाठी ३३ के.व्ही मुळा डॅम विद्युत वाहिनी १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शटडाउन घेण्यात आला आहे. तसेच सदर शटडाउन वेळेत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणीपुरवठा योजनेवरील महत्वाची दुरूस्तीची कामे घेण्यात येणार आहे. दरम्यान काळात मुळानगर, विळद येथून होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार असल्याने शहर पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता येणार नाही. त्यामुळे १९ ऑक्टोबर रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहररोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच सारसनगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास पाणीपुरवठा होउ शकणार नाही. सदरचा पाणीपुरवठा हा २० ऑक्टोबर रोजी करणेत येईल.

तसेच २० ऑक्टोबर रोजी रोटेशननुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळु बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी. व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इ. भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही. या भागातील पाणी पुरवठा हा २१ ऑक्टोबर रोजी करण्यात येईल. २१ ऑक्टोबर रोजी पाणी पुरवठा होवू घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळेरोड, आनंदीबाजार, कापड बाजार, खिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने मनपा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इ.भागात पाणी पुरवठा होणार नसून तो २२ ऑक्टोबर रोजी करण्यात येईल. शहरातील पाणीपुरवठा एक दिवस बंद करुन उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले आहे, अशा भागात पाणीपुरवठा करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

नागरिकांनी असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून सहकार्य करावे, असे मनपाने म्हटले आहे.

## संपतलाल गुंदेचा यांचे हृदयविकाराने निधन

नगर - येथील सिव्हील हडको कॉलनीत राहणारे संपतलाल धनराज गुंदेचा (वय ७२) यांचे १८ ऑक्टोबर रोजी दु.४.३० वा हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर रात्री १० वा. नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



अमृतलाल गुंदेचा (मिरीवाला) यांचे ते बंधू तर संतोष गुंदेचा यांचे वडील तसेच महाराष्ट्र बुक स्टॉलचे अजित बोरा व मनोज बोरा यांच्या आत्याचे पती होत. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## संजय मेहत्रे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर येथील मुळा-प्रवराचे माजी कर्मचारी संजय भाऊसाहेब मेहत्रे (वय ६०) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अभियंता भूषण मेहत्रे यांचे वडील होत.

**रेखा जरे खून खटल्यातील साक्षीदारास धमकी**

# न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्याने जिल्हा पोलिस अधिक्षकांना बजावली नोटीस

नगर - बहूचर्चित रेखा जरे खून खटल्यातील साक्षीदारास पोलिस संरक्षण देण्याचे आदेश देऊनही सदर आदेशाचे पालन न केल्याप्रकणी जिल्हा न्यायालयाने जिल्हा पोलिस अधीक्षकांना नोटीस बजावली आहे अशी माहिती मुळ फिर्यादीचे वकिल ॲड सुरेश लगड यांनी दिली आहे.

रेखा जरे खून खटल्यातील सरकारी पक्षाचे साक्षीदार डॉ.विजय अण्णासाहेब मकासरे यांना मुख्य आरोपी बाळ ज.बोठे याचा भाऊ अनुपम बोठे याने धमक्या दिल्या होत्या. याबाबत मकासरे यांनी पोलिस अधिक्षक यांच्याकडे पोलिस संरक्षण देण्याबाबत मागणी अर्ज केला होता. सदर अर्जावर पोलिस अधिक्षकांनी कोणतीच कार्यवाही केली नसल्याने साक्षीदारास साक्ष देता आली नाही त्यामुळे त्यांनी न्यायालयाकडे अर्ज दाखल केला. न्यायालयाने साक्षीदारास पोलिस संरक्षण देण्याचे आदेश दिले होते. यासंदर्भात शनिवारी (दि.१९) जिल्हा न्यायाधिश क्र.२ एम.एच. शेख यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी साक्षीदार मकासरे हजर होते. पोलिस संरक्षण देण्याबाबत पोलिस अधीक्षकांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नसल्याने साक्षीदारास साक्ष नोंदवणे शक्य झाले नाही ही बाब सरकार पक्षातर्फे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली त्यावर न्यायालयाच्या आदेशाचे पालन का केले नाही अशी नोटीस बजावत जिल्हा पोलिस अधीक्षकांना हजर रहाण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.सरकार पक्षातर्फे ॲड.अनिल ढगे, मुळ फिर्यादीच्यावतीने ॲड सुरेश लगड यांनी न्यायालयात बाजू मांडली.

# ९५० किलो गोमांस भरलेला पिकअप नगरमध्ये पकडला

**पोलिसांची मध्यरात्री कारवाई; एकावर गुन्हा दाखल**

नगर - नगर शहरातील जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील काळी मस्जिद चौकात कोतवाली पोलिसांच्या पथकाने ९५० किलो गोमांस वाहतूक करणारा पिक अप पकडला आहे. शुक्रवारी (दि.१८) मध्यरात्री १२.१० च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून १ लाख ९० हजार रुपये किमतीचे गोमांस आणि ४ लाख रुपये किमतीचा पिकअप असा ५ लाख ९० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

राज्यात गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास आणि गोमांस विक्रीस बंदी असताना नगर शहरात अनेक ठिकाणी अवैध कत्तलखाने सुरु असून त्यामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल केली जात आहे. या पूर्वी अनेकदा या कत्तलखान्यांवर पोलिसांनी छापे मारत कारवाई केलेली आहे. तरीही हे कत्तलखाने सुरूच आहेत. त्यामुळे कोतवाली पोलिसांचे रात्रगस्त पथक अवैध गोमांस वाहतुकीवर नजर ठेवून असते. शुक्रवारी मध्यरात्री हे पथक गस्त घालत असताना जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील काळी मस्जिद चौकात एक पिकअप वाहन संशयास्पद जाताना दिसले. पोलिसांनी सदर वाहन थांबवून तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणावर गोमांस असलेले दिसून आले. पोलिसांनी ते ताब्यात घेतले. वाहन चालक शादाब गुलाम रसूल कुरेशी याला ताब्यात घेत त्याच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात पो. हे.कॉ. संभाजी कोतकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### सुलभ होणार कॅन्सर निदान

कॅन्सरसारख्या दुर्धर विकाराचं वेळेत निदान होणं गरजेचं असतं. कॅन्सरचं निदान करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. आता त्यात आणखी एका पद्धतीची भर पडली आहे. नॅनोपार्टिकल्समधून उत्सर्जित होणाऱ्या प्रकाशाच्या माध्यमातून छोट्या आकाराचे ट्यूमर शोधून त्यांच्या वाढीचा वेग जाणून घेणं आता शक्य होणार आहे. यामुळे या विकाराचं निदान पहिल्या टप्प्यातच करता येईल. 'नेचर बायोमेडिकल इंजिनिअरींग' या सायन्स जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित झाला आहे. एमआरआय आणि कॅन्सर निदानाच्या इतर पद्धतींच्या तुलनेत ही नवी पद्धत अधिक अचूक आणि सुलभ आहे.

## पाककला

### क्रीम कोशिंबीर

**साहित्य** : कोवळी फरसबी (श्रावण-घेवडा), फ्लॉवर, ओला मटार, गाजर (शक्यतो लाल रंगाचे) व बटाटा. या सर्व भाज्यांच्या फोडी प्रत्येकी अर्धी वाटी, दूध दोन वाट्या, क्रीम एक वाटी, कॉर्नफ्लोअर दोन चमचे, मीठ, साखर व मिरीची पूड चवीपुरती.

**कृती** : सर्व भाज्या वाफवून घ्याव्या. कॉर्नफ्लोअर दुधात शिजवून त्याची पातळसर पेस्ट तयार करावी. त्यात चवीप्रमाणे मीठ व साखर घालावी. हे शिजविलेले कॉर्नफ्लोअर गरमच घेऊन ते वाफवलेल्या गरम भाज्यांवर घालावे व त्यावर क्रीम व मिरीची पूड घालावी. ही कोशिंबीर विशेषतः गरम अशी खाण्यास चांगली लागते.

## वास्तू

### वास्तुतज्ज्ञांचा सल्ला

प्लॉटबाबत एक आशाजनक मुद्दा म्हणजे कुठल्याही प्रकारच्या प्लॉटमध्ये वास्तू तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने काम केल्यास अनेक प्रकारे त्या भूखंडातील हानीकारक मुद्दे कमी करून तो जास्तीत जास्त लाभदायी करता येणे हमखास शक्य आहे.

## सल्ला

दूध पूर्ण दिवस चांगले राहण्यासाठी त्यात छोटी वेलची पूड टाकावी.

## सौंदर्य

चांगले तूप ओठांवर हलक्या हाताने चोळून जिरवावे. म्हणजे ओठांना आर्द्रता प्राप्त होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४

**संकष्ट चतुर्थी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, कृत्तिका ०८।३२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : काळजीपूर्वक कार्य कराल. कामे जलदगतीने आटोपतील.

**वृषभ** : संभाषणात सावधगिरी न बाळगल्याने अर्थाचा अनर्थ होऊन नुकसान होईल.

**मिथुन** : कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल. नोकरदारांना सहकार्यांची मदत मिळेल.

**कर्क** : आजचा दिवस चांगला नाही आणि कार्य करण्यासाठी कष्ट घ्यावे लागतील.

**सिंह** : कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. खर्च अधिक होईल.

**कन्या** : शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्ट सुरू होईल.

**तूळ** : व्यापार व्यवसायात आशादायक परिणाम मिळतील.

**वृश्चिक** : आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल. तब्येत ठीक असेल.

**धनु** : आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घ्याल.

**मकर** : वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील.

**कुंभ** : मागील उधारी वसुल होईल. आपल्या क्रोधावर संयम ठेवाल. जुने जाणते आर्शिवाद देतील.

**मीन** : आजच्या दिवसाचा उपयोग नाती-संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी कराल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

देव - मी तुझ्यावर प्रसन्न आहे. काय पाहिजे?
गण्या - पैशांनी भरलेली इरस, नोकरी आणि एक मोठ्ठी गाडी ज्यामध्ये खूप सुंदर मुली असतील.
देव - तथास्तु
(गण्या आता कंडक्टर आहे)

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* मँगेनीज खनिजासाठी कोणते जिल्हे प्रसिद्ध आहेत? - चंद्रपूर
* सन २०१७ चा हिंद केसरी कोण? - सुमित कुमार
* सरदार वल्लभभाई पटेल यांनी कोणता सत्याग्रह केला? - बार्डोली सत्याग्रह
* सिंधू संस्कृती ही कोणत्या प्रकारची संस्कृती होती? - शहरी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०३४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | | | ■ | ९ | | | |
| ■ | ■ | १० | ११ | | ■ | | ■ |
| १२ | १३ | ■ | १४ | | १५ | ■ | १६ |
| १७ | | १८ | | ■ | १९ | २० | |
| | ■ | २१ | | | ■ | | ■ |
| ■ | २२ | | | ■ | २३ | | २४ |
| २५ | | | | ■ | २६ | | |

**आडवे शब्द :-** १) मिलाफ; संगम; एकत्रीकरण ४) अकरावी तिथी ८) खाद्यपदार्थाचा एखादा कण चुकून श्वासनलिकेत गेला असता येणारा जोराचा खोकला ९) कागदाचे कापलेले बारीक तुकडे १०) कागदाचा चतुर्थांश स्तंभ १२) झोपताना डोक्याखाली घेतात ती मऊ वस्तू १४) टोळी; चमू; टीम १७) दैना; दुर्दशा १९) उसापासून बनणारा एक गोड पदार्थ २१) एक प्रकारची चोळी २२) केस काळे करण्याचे रसायन २३) अमावास्या २५) पलीकडची बाजू; पैलतीर २६) दिन; दीस; दिवस

**उभे शब्द :-** १) याची चव खारट असते २) जखमेतून वाहणारा द्रव ३) नाही म्हणणे ४) भारुडासाठी प्रसिद्ध असलेले पैठणचे संत ५) सर्पाने टाकलेली त्वचा ६) नदीचे उंच तीर; डोंगराची तुटलेली बाजू ७) थकवा; मरगळ; ग्लानी ११) कपडालत्ता; वस्त्रप्रावरण १२) भाषेचा एक अलंकार; रव्यापासून बनणारा एक खमंग खाद्यपदार्थ १३) नाडी; रक्तवाहिनी; धमनी १५) कोणत्या प्रकारचा १६) पिसारा फुलविणारा पक्षी १८) वकिलाचा व्यवसाय; वकिली २०) कोवळे दूध तापवून त्यात साखर वगैरे घालून केलेला खाद्यपदार्थ २२) ओढा; रोख ; झोक २३) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी २४) माळ; हार; तुलना; बरोबरी

### शब्दगंध क्र. ७०३३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | हि | त्य | सं | मे | ल | न | ■ |
| धा | क | ■ | क | ण | व | ■ | पा |
| ■ | म | क | र | ■ | क | पा | ळ |
| पा | त | ळ | ■ | म | र | क | त |
| या | ■ | स | मा | न | ■ | शा | ■ |
| ■ | को | ■ | व | न | ■ | स | वा |
| स | ळ | स | ळ | ■ | स | न | द |
| मा | सा | ■ | ती | न | दा | ■ | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आयुष्य जर तुम्हाला मागे खेचत असेल तर तुम्ही नक्कीच खूप पुढे जाणार आहात कारण धनुष्याचा बाण लांब जाण्यासाठी आधी मागेच खेचावा लागतो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### खनिज तेल कसे मिळते?

खनिज तेल म्हणजे पेट्रोल ज्यातून वेगळे करून काढतात ते निसर्गतः सापडणारे तेल. पेट्रोल तर आपल्याला आज सतत उपयोगी पडत असते. मोटारी, स्कूटर्स आदी वाहने पेट्रोलवर चालतात. तर ट्रॅक्टर्स, ट्रक, बस आदी वाहने डिझेलवर चालतात. ही दोन्ही इंधन तेले आपल्याला नैसर्गिक खनिज तेलापासून मिळत असतात.

खनिज तेल हे चिकट, दाट, काळपट रंगाचे द्रव या स्वरूपात सापडते. लक्षावधी वर्षांपूर्वीच्या सागरी प्राण्यांच्या व वनस्पतींच्या अवशेषांवर दाब पडून हे खनिज तेल तयार झालेले असते. हे तेल द्रव असल्यामुळे द्रवाचे सर्व नियम त्याला लागू असतात. भूमीतील द्रवाच्या हालचाली ज्यातून होऊ शकतात अशा खडकात हा द्रव पदार्थ असतो. तो दगड फोडून या थरात पोचलेल्या नळांवाटे तो जमिनीवर आणण्यात येतो व या द्रवाचे भागशः ऊर्ध्वपातन आणि शुद्धीकरण करून पेट्रोल, नॅप्था, केरोसीन, डिझेल, मेण इत्यादी भाग वेगळे करण्यात येतात.

आता खनिज तेल समुद्रतळाखालूनही काढण्यात येते. अरब देशांतून तेलाचे प्रचंड साठे आहेत. भारतात आसाम, गुजराथ आणि पश्चिम किनाऱ्यावर कच्छ ते रत्नागिरी दरम्यानच्या सागरात नैसर्गिक वायू आणि खनिज तेल सापडले आहे.

## ज्याचे त्याचे जीवन

एक बैल आणि एक डास यांची अगदी जीवलग मैत्री होती. डास नेहमी बैलाच्या पाठीवर बसलेला असायचा. बैल जरी काम करीत असला तरी त्या दोघांच्या गप्पा-गोष्टी चालू असायच्या. त्यामुळे बैलाला आपले काम करणे सोपे जायचे.

डासाला तशी कामकाजाची काहीच चिंता नसायची. त्याने एखाद्या माणसाचा कडकडून चावा घेतला तरी त्याचे पोट भरायचे. बैलाला मात्र सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबावे लागायचे.

'मित्रा, तुझ्या एकदा दोघांच्या गप्पा अशाच रंगल्या होत्या. डास म्हणाला, तुझ्या आणि माझ्या जीवनात मोठा फरक आहे नाही? तू एवढा बलशाली असून तुला काम करावे लागते. माणसाच्या हातून चाबकाचे फटकारे खावे लागतात. मी मात्र काहीही काम न करता माणसाचे थोडे रक्त शोषून माझे पोट भरतो.'

त्यावर बैल हसून म्हणाला, 'मी जरी शेतात काम करीत असलो, कष्ट उपसत असलो तरी मला त्याची खंत नाही. तसेच माणसाच्या हातून मार खात असलो तरी मला त्याचे वाईट वाटत नाही. कारण माझ्या चुकीचेच मला फळ भोगावे लागते. माझा मालक मला जीवाने कधीच मारणार नाही. मात्र तुझा जीव मात्र नेहमीच धोक्यात असतो.'

'तो कसा काय?' डासाने विचारले.

'तो असा की, तू जरी माणसाचे रक्त पिऊन जगत असलास तरी तुला मारण्यासाठी माणूस नेहमी टपलेला असतो आणि त्याचा मार वाचविण्यासाठी तुला सारखी धडपड करावी लागते आणि त्यात जर फटका बसलाच तर तुमचा खातमा ठरलेला आहेच. मालक जरी मला मारत असला तरी पोळ्याला तो मला सजवतो. त्याचप्रमाणे गोडधोड खाऊ घालतो. तेव्हा मी सुखी आहे.'

तात्पर्य - 'जीवनाकडे तुम्ही जसे बघाल तसे ते तुम्हाला दिसेल.' म्हणून दुःखातही सुख मानावे.



## जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

### जीवन की रोशनी

भगवत् पुराण में लिखा है मरते हुये मनुष्य को दस लाख बिच्छुओं के इकट्ठा डंक मारने जितना कष्ट होता है। यह सारा कथन केवल उस भयंकर कष्ट का अलंकार रूप वर्णन ही है जो मनुष्य उस समय अनुभव करता है जब मौत का दैत्य उसकी आत्मा को जबरदस्ती खींचकर शरीर में से बाहर निकालता है। वास्तव में क्या बीतती है, यह तो केवल मरता हुआ मनुष्य ही जानता है। किसी मरे हुये मनुष्य ने मौत की सीमा के इधर आकर कभी नहीं बताया कि उसे किस प्रकार का कष्ट सहना पड़ा। सारे इसे सहन करते हैं और फिर सदा के लिये मौन हो जाते हैं। मौत के बिस्तर पर लेटना, सूली पर चढ़ना और मौत का कमरा एक तरह की श्मशान भूमि जैसा होता है। कण्ठ बजते हुये जब मरने वाला जीव बेआरामी और अत्यन्त दुखों से दुहरा हो रहा होता है तो देखने वालों पर प्रभाव पड़े बिना नहीं रह सकता। मौत की यातनाओं को कौन शान्त कर सकता है? सारे मजबूरी में खड़े रह जाते हैं। अच्छे से अच्छे डॉक्टर अन्त तक दवाई देते रहते हैं। नर्सों पैरों के भार खड़ी रहती हैं। निकट सम्बन्धी भरी हुई उदास नज़रें और गम्भीर चेहरे लिये हुये मौत की प्रतीक्षा कर रहे होते हैं। उस बेचारे की जीवन संगनी (पत्नी) और बच्चों की दर्द भरी चीखें कौन सुन सकता है?

देहरी बैठ माता रोवै खटिया ले गये भाई ।।
लट छिटकाए तिरीया रोवै हंसु अकेला जाई ।।
(राग आसा कबीर जी)

मैसेडोनिया के राजा और अपने समय के संसार विजेता सिकन्दर महान (३५६-३२३ ई.पू.) के बारे में वर्णन है कि उसे ज्योतिषियों ने कहा था

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

### अपने आप से प्रेम करना

मैं सही मायनों में अनुभव करने लगता हूँ कि मैं कौन हूँ- एक प्रकाशमय अस्तित्व, जो अच्छी तरह से जानता है कि मेरे बाहर और भीतर क्या घटित हो रहा है; प्रकाश ऊर्जा का एक सूक्ष्म बिदु- यही वह जीवनी शक्ति है, जो भौतिक आकार लेती है, परंतु फिर भी इससे विलग है।

स्व की इस विशुद्ध चेतना में स्थिर मैं सरलता व स्वाभाविकता के साथ उस सर्वोच्च सत्ता के साथ संपर्क साध सकता हूँ, जो मेरी ही तरह प्रकाश का असीम स्रोत है तथा शाश्वत रूप से शांति, परमानंद व प्रेम से लबालब छलकता है। मैं इन स्नेही स्पंदनों का आनंद लेता हूँ और फिर अनुभव करता हूँ कि मैं संपूर्ण मौन व शांति के आयाम में घिरा चला जा रहा हूँ।

मैं एक गहरे अपनेपन का अनुभव करता हूँ, मानो कोई बालक बहुत समय से खोए हुए माता-पिता से भेंट कर रहा हो। मैं स्वयं को सुरक्षित, सलामत, स्वीकृत और स्नेह से सिंचित पाता हूँ। मानो समय स्थिर हो गया हो और केवल यही महत्त्वपूर्ण कार्य शेष है कि मैं जितना प्रेम व शक्ति एकत्र कर सकता हूँ, उसे एकत्र कर लूँ।

बाहरी दुनिया के सभी जालों व प्रलोभनों से मुक्त मैं हर चीज को एक नए नजरिए से देखता हूँ-मेरी नजर में प्रशंसा, किंतु अनासक्ति का भाव है। अब मैं किसी भी नकारात्मकता के अधीन नहीं रहा। मैं शांत, स्थिर, मुक्त, शक्तिशाली

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'अगले हप्ते और एक कुली हप्ता नही देगा...' (दिवार)

गुंड-मवाली पिटरचा माणूस गरिब, असहाय्य कामगारांकडुन पगार झाल्या दिवशी हप्ता गोळा करतो आहे. कामगार रांगेतुन येऊन त्याने ठेवलेल्या डब्यात नोटा टाकताहेत. निघुन जाताहेत. एकाचा पहिला पगार झाला. तो म्हणतो मी, माझ्या मेहनतीचा पैसा असा फुकट हप्ता म्हणून देणार नाही. रहिमचाचा त्याला समजावतात. पण तो ऐकत नाही. त्या मवाल्यालाही म्हणतो मी हप्ता देणार नाही. तो मवाली त्याच्या शर्टच्या खिशातुन बळजबरीने पैसे काढु लागतो. झटापटीत नोटा खिशातुन फेकल्या जातात, रस्त्यावर पडतात. तो कष्टाचे पैसे गोळा करत असतांना भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकखाली चिरडला जातो. मरतो. ही घटना अमिताभ बच्चन समोर घडते. रहिमचाचाला अमिताभ बच्चन म्हणतो, जो पिछले पचीस बरस में नही हुआ, वो अब होगा। अगले हप्ते और एक कुली हप्ता देगा नही। खरंच तो सामान्य माणसाच्या मनातलं बोलतो. आपण कष्ट करायचे आणि एखाद्या मवाल्याने तो पैसा हिसकावुन घ्यायचा. मग सामान्य माणसाने जगायचं तरी कसं? हा अन्याय गुपचुपपणे का सहन करायचा? मुळात आपण ह्या मवाल्यांना, गुंडांना प्रचंड घाबरतो कारण ही नालायक मंडळी पैश्यांसाठी आपल्याला मारतात. त्या मवाल्यांमध्ये ममत्व, वात्सल्य ह्या भावनाच नसतात. आपल्याला चिड येणं अगदी स्वाभाविक आहे.

पुढच्या पगाराच्या दिवशी पुन्हा कामगारांची हप्ता देण्यासाठी रांग. एकेकजण त्या डब्यात निमुटपणे, असहाय्यपणे नोट टाकतो आणि आपल्या घराच्या ओढीने चालु लागतो. हर एक को अपनी जान प्यारी होती है. अमिताभ बच्चनचा नंबर येतो. तो डब्यात नोट टाकत नाही. त्या मवाल्याची धुलाई करतो. मग पीटरचे गुंड मित्र, अमिताभ बच्चनला मारण्यासाठी शोधु लागतात. तर हा 'हिरो' त्यांच्याच अड्ड्यावर जाऊन त्यांची वाट पाहात बसतो आणि ते आल्यावर त्यांना यथेच्छ बदडतो. खरं तर हा फक्त एक सीन (दृष्य) नाही हे तर सामान्य व्यक्तीमध्ये असामान्य करण्याची, गुंडांना मारण्याची प्रचंड ताकत असते आणि अन्याय होत असेल तर घाबरु नका, अन्याय करणारे समोरचे चार असोत की दहा असोत तुम्ही न घाबरता, तुमच्यातली ताकद, तुमच्यातलं सर्वस्वपणाला लाऊन अन्यायाच्या विरोधात उभे रहा हे सांगण्याचा सुपर डुपर हिट 'दिवार' मधल्या अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चनचा हा प्रयत्न आहे.

जे सामान्य माणसाला वाटतं तेच दिवारमधल्या अमिताभ बच्चनलाही वाटतं. पण ते वाटणं अगदी मनापासून असतं. हे मनापासून वाटणं हिच खरी ताकद आहे, आधार आहे. एखादी चांगली कृती करायची असेल तर फक्त एकदा वाईटपणा घ्या पुढे आयुष्यभर अन्याय सहन करावा लागणार नाही. आपल्यावर अन्याय होत असतांनाही आपण गप्प बसणार असु तर उद्या तुम्ही गुलाम म्हणुनच जगणार. अनेक वर्षे शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगा. जगण्याचं सार्थक होईल. खरं तर ते शे-दिडशे कामगार एकत्र आले असते तर त्यांनी हप्ता गोळा करणाऱ्या मवाल्याला यथेच्छ धुतला असता पण वाईटपणा घ्यायचा कोणी हा प्रश्न महत्वाचा आहे. आपण गुंडाला मारलं तर त्याचे साथीदार आपल्याला जीवंत ठेवणार नाहीत, ह्या भितीनेच आपण गर्भगळीत होतो, अन्याय सहन करण्याची ताकद वाढवत राहातो. पण त्या शे-दिडशे कामगारांमध्ये एखादा 'हिरो' असतोच जो मरणाला घाबरत नसतो. आपल्यामुळं इतरांच चांगलं करणं नक्कीच आपल्या हातात आहे हे तो ओळखुन असतो. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता गुंडांना-मवाल्यांना रक्त बंबाळ झाला तरी मारतोच कारण अन्याय सहन करायचाच नाही हे त्याने ठाम ठरवलेलं असतं.

आपल्या दैनंदिन जीवनात आपण अन्याय सहन करत असु तर जगुन काय उपयोग ? रडत कुढत जगण्याऐवजी लढत-लढत जगणं आपल्यासह इतरांनाही प्रेरणादायी असतं. अन्यायाच्या विरोधात लढण्याची शक्ती प्रत्येकात असते. तिचा उपयोग करायचाच. इतरांवर अन्याय होतांनाही तुमच्या तळपायाची आग मस्तकात गेली पाहिजे, तुम्ही न्यायासाठी प्रयत्न करायचाच. हेच आपल्या जीवंतपणाचं लक्षण आहे. म्हणूनच 'दिवार' मधला विजय (अमिताभ) सर्वसामान्याच्या जे मनात आहे ते ते चांगलं करतोच. पंचवीस वर्षांपासून होणारा अन्याय थांबवण्याची ताकद कोणा एकातही असते फक्त जिगर असायला पाहिजे.

(लेख क्र.५२२)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार,
मो.९८२२७५८३८३

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

### गर्भाधान विधी

**५) नामकरण संस्कार** : बाळाचा जन्म झाल्यानंतर पुढील आयुष्यात त्याची विशिष्ट नावाने ओळख होणे जरुरीचे असते. त्या नावावरून त्याला यशप्राप्ती, दीर्घायुष्य मिळण्यासाठी शुभदिवशी अर्थपूर्ण नाव ठेवले जाते. यालाच नामकरण संस्कार म्हणतात.

**६) निष्क्रमण संस्कार** : बाळाला जेव्हा पहिल्यांदा घराबाहेर नेले जाते त्या वेळेस जो संस्कार केला जातो, त्याला निष्क्रमण संस्कार असे म्हणतात. बाळाला ज्या दिवशी घराबाहेर घेऊन जायचे आहे त्या दिवशी बाळाला देवघरामधील कुंकवाचा टिळा लावावा. त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करावी. त्याला इतर लोकांची नजर लागू नये, याची देवाजवळ प्रार्थना करावी व प्रथमतः त्याला घराबाहेर नेल्यावर मंदिरामध्ये दर्शन घेण्यास जावे व देवादिकांचा शुभाशीर्वाद घ्यावा.

**७) अन्नप्राशन संस्कार** : आईच्या दूधाशिवाय बाळाला जेव्हा बाहेरचे अन्न सुरू करतो.

**(क्रमशः)**


**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# बांधकाम परवानगीसाठी संगणकीय प्रणाली










अ) बी पी एम एस (BPMS) प्रणाली/प्री डी सी आर (PRE DCR/ AUTO DCR) प्रणाली

केंद्र शासनाच्या व्यवसाय सुलभता उपक्रमांतर्गत महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून माननीय मुख्यमंत्री व शासनाने सहमती दर्शवली आहे. सदर प्रणाली हि महाराष्ट्रामधील नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका मध्ये विविध बांधकाम परवानगी प्रक्रियेचे प्रमाणीकरण करावयाच्या दृष्टीकोनातून पोर्टल/संगणकीय प्रणाली तयार करून बिल्डींग प्लान मॅनेजमेंट सिस्टीम (बीपी एम एस) तसेच प्री डी सी आर (AUTO DCR) राबविण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ द्वारे बी पी एम एस तसेच सॉफ्टटेक कंपनीद्वारे प्री डी सी आर (AUTO DCR) ही प्रणाली उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर प्रकल्पात खालील प्रकारचे प्रस्ताव दाखल केला जाऊ शकतात.

बांधकाम परवानगी, सुधारित बांधकाम परवानगी, प्लिंथ इंटिमेशन, भोगवटा प्रस्ताव तसेच विकास परवानगी ले-आऊट मंजूरी, प्लॉट एकत्रीकरण,प्लॉटची उपविभागणी इ. प्रकारची सर्व प्रकरणे संगणकीय प्रणाली मधून दाखल करून घेतली जातात. संगणकीय प्रणालीमध्ये सामाविष्ट होणार घटक.

**१) वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्नीकल पर्सन (सुपरवायजर)**

२) जागा मालक, बिल्डर

३) सॉफ्टवेअर

४) मंजुरी देणारा तांत्रिक कर्मचारी वर्ग

**१) वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्नीकल पर्सन(सुपरवायजर)**

सर्वात प्रथम संगणकीय प्रणाली दवारे प्रस्ताव दाखल करण्यासाठी वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन(सुपरवायजर) यांना संगणकीय प्रणालीमध्ये स्वताचे रजिस्ट्रेशन (परवाना) घेणे आवश्यक आहे. सदर प्रणालीमध्ये रजिस्ट्रेशन करण्यासाठी रजिस्टर नावाच्या ऑप्शनमधून शैक्षणिक पात्रता नुसार रजिस्टर करता येते. सदर प्रणालीमधून आर्किटेक्ट, इंजिनिअर, स्ट्रक्टरल इंजिनिअर, सुपरवायर-१, सुपरवायर-२ इ. प्रकारची नोंदणी करता येऊ शकते. टेक्नीकल प्रकारच्या रजिस्ट्रेशन साठी दोन प्रकारचे पर्याय उपलब्ध आहेत.

१) स्टेट रजिस्ट्रेशन (राज्यस्तरीय नोंदणी)

२) युएल बी (पालिका, महानगरपालिका स्तरीय नोंदणी)

**१) राज्यस्तरीय नोंदणी (STATE REGISTRATION)**

सदर प्रकारची नोंदणी ही नोंदणी करताना State Level या प्रकारावर टीक करून दाखल करता येते. एकदा या प्रकाराम धून नोंदणी केली असता, परत पालिका अथवा महानगरपालिका साठी वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. कारण सदर प्रकारच्या नोंदणी मध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व नगरपरिषद, पालिका, महानगरपालिका यांचा समावेश केलेला आहे. सदर प्रकारच्या नोंदणीचे नोंदणी शुल्क पुढील प्रमाणे असते. आर्किटेक्टसाठी नोंदणी शुल्क भरण्याची गरज नसते, तसेच इंजिनिअर, स्ट्रक्चरल इंजिनिअर - ३०००/- सुपरवायजर १ व २ प्रकार साठी १५००/- प्रति ३ वर्ष साठी नोंदणी शुल्क भरावी लागते

**२) ULB Wise नोंदणी**

सदर प्रकारच्या नोंदणीमध्ये युजरला फक्त ज्या पालिकेला अथवा महानगरपालिकासाठी नोंदणी करायची आहे ती एकच पालिका आठ महापालिका रजिस्टर करता येते. एकदा युजरने नोंदणी साठी अर्ज केला की, राज्यस्तरीय नोंदणी पुणे आणि ULB प्रकारची नोंदणी निवडलेल्या संस्थेमधून तांत्रिक कर्मचारी मंजूर करून देतात. नोंदणीच्या प्रक्रियेचे एस एम एस द्वारे टेक्निकल व्यक्तिला डिटेल्स मिळतात. रजिस्ट्रेशन मंजूर झाल्यानंतर त्याचे नोंदणी शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरले जाऊ शकते. STATE LEVEL साठीची फी ही चलनद्वारे भरता येत. युजरने भरलेली रक्कम/शुल्क पडताळणी झाल्यानंतर ID चालू होतो आणि त्या नंतरच प्रकरणे दाखल करता येतात. तसेच License हे डिजिटल स्वाक्षरी होऊन युजरला आय डी मध्ये Certificate Print मध्ये दिसून जाते. टेक्निकल व्यक्तीला एकदा ID चालू झाला की बांधकाम परवानगी प्रकरणे दाखल करता येऊ शकतात.



**३) जागा मालक/बिल्डर**

प्लॉटधारक अथवा बिल्डर यांना परवानगी होण्यासाठी स्वताःचे नावाचे रजिस्ट्रेशन संगणकीय प्रणालीद्वारे करावे लागते. यात रजिस्ट्रेशन करण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल नंबर आणि Email ID ची आवश्यकता असते. सदर रजिस्ट्रेशनसाठी तांत्रिक मंजूरीची आवश्यकता नाही. सदर ID मध्ये ID धारकाचे मंजूर नकाशा, त्याचे पत्र पाहता येऊ शकतात, तसेच मंजूर झालेल्या प्रकरणाचे शुल्क देखील भरता येऊ शकते. तसेच दाखल केलेल्या प्रकरणाची सदय स्थिती (status) पाहता येते.

**३) सॉफ्टवेअर**

संगणकीय प्रणालीद्वारे विविध प्रकारची प्रकरणे दाखल करताना सॉप्टवेअर महत्वाचा घटक आहे. कोणतेही प्रकरण दाखल करण्याआधी सदर प्रकरणाचा नकाशा (Plan) परवानाधरक व्यक्तीकडूनच बनवून व दाखल करून घेण्यात यावा. सदर नकाशा हा शासनाच्या UDCPR प्रणालीप्रमाणेच बनवून संगणकीय प्रणालीद्वारे प्रकरण दाखल करण्यासाठी Software ची आवश्यकता आहे. संगणकीय प्रणालीद्वारे प्रकरण दाखल करण्यासाठी संकेतस्थळावर सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. त्यात TP Client हे BPMS https://mahavastu.maharashtra.gov.in/ आणि PREDCR हे AUTODCR (सॉफ्टटेक) https://maha.autodcr.com/BPMSClient/Default.aspx द्वारे निशुल्क उपलब्ध आहे. सदर सॉफ्टवेअर हे महाराष्ट्र शासनाच्या UDCPR नियमावलीनुसार बनविलेले अहित. त्यामुळे दाखल प्रकरणाची सर्व छाननी योग्य पद्धतीने झाल्यानंतरच प्रकरण ऑनलाइन दाखल करता येते. सॉफ्टवेअर कशा पद्धतीने work/operate करते यासाठीचे video साइटवर उपलब्ध करून दिलेले आहेत. तसेच दर बुधवारी सॉफ्टवेअर कशा पध्दतीने चालवायची (operate) करायची याचे सकाळी ११ वाजता training दिले जाते.

**४) तांत्रिक कर्मचारी वर्ग- (Approval User)**

वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्नीकल पर्सन (सुपरवायजर) यांनी संगणकीय प्राणाली द्वारे बांधकाम प्रस्ताव दाखल केल्यानंतर सदर प्रकरण हे Areawise दाखल होतात. संगणकीय प्रणालीमध्ये हद्दीमधील गावाप्रमाणे Area तांत्रिक कर्मचारी यांना नेमून दिलेला आहे. त्यामुळे दाखल केलेले प्रकरणे ही Automatically Area नुसार Authority ID मध्ये जातात. दाखल झालेल्या प्रकरणाची medule नुसार वर्गवारी Approval User च्या ID मध्ये उपलब्ध केलेली असते. तांत्रिक कर्मचारी खालील प्रमाणे प्रकरणाची पडताळणी करतात.

**1) Documents Verification**

**2) Site Visit Selection/ Site Visit Entry**

**3) Proposal pproval**

दाखल केलेल्या प्रकरणाची योग्य ती छाननी केली जाते. त्यात सर्वात प्रथम वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांनी दाखल केलेल्या प्रस्तावाची कागदपत्रांची पडताळणी केली जाते. कागदपत्रांची काही अपूर्तता असेल तर सदर प्रस्ताव योग्य त्या कारणासह Technical Person च्या ID मध्ये पाठवला जातो. Technical Person ने कागदपत्रे तसेच नकाशाची पूर्तता केल्यानंतर सदर प्रकरण परत Approval User च्या ID मध्ये जाते. सर्व प्रकरण UDCPR प्रमाण योग्य असल्यास ते वेरिफाय करून स्थळ पाहणीसाठी वेळ दिली जाते. स्थळ पाहणी करून त्या प्रकरणाचा Site Visit Entry Report भरुन RR प्रमाणे Post Payment Charges Add करून वरिष्ठ अधिकारी यांना मंजूरीसाठी पाठवले जाते.

वरिष्ठ अधिकारी सर्व प्रकरण तसेच तांत्रिक कर्मचारी यांचे सर्व Remark पाहून प्रकरण योग्य असल्याची खात्री करून मंजूर करतात. मंजूर प्रकरण हे वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) अथवा जागा मालक ज्यांचे Registration असेल त्यांच्या ID मध्ये Post Payment भरण्यासाठी दिसून जाते. Post Payment भरना Online किंवा RTGS द्वारे भरला जाऊ शकतो. RTGS केला असेल तर त्याची पावती हि online upload करून पालिकेने verify करणे आवश्यक असते. भरणा भरल्यानंतर Technical Person Owner Ekyc आणि स्वत:ची डिजिटल साइन केल्यानंतर प्रकरण Approval Authority कडे डिजिटल स्वाक्षरी साठी उपलब्ध उपलब्ध होते. Approval Authority यांनी डिजिटल स्वाक्षरी केल्यानंतर सदर प्रकरण हे वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांच्या ID मध्ये उपलब्ध होऊन जाते.

**क) संगणकीय प्रणाली फायदे**

१) संगणकीय प्रणालीद्वारे दाखल केलेल्या प्रस्तावाची User अथवा मालक यांना step by step माहिती उपलब्ध होते.

२) आपण दाखल केलेले कागदपत्र तसेच नकाशा हा पूर्णपणे डिजिटल स्वरूपात प्रणालीमध्ये सुरक्षित राहतो, त्यामुळे प्रस्ताव गहाळ होण्याचे प्रमाण अथवा तोटे नाहीत.

३) दाखल अथवा मंजूर प्रकरणाच्या प्रती या डिजिटल असल्यामुळे आपणास पाहिजे तेव्हा संकेतस्थळावरून घेता येतात.

४) तसेच दाखल आणि मंजूर प्रकरणाची भरलेली पावती संगणकीय प्रणालीमधून कधीही घेता येते.

५) Website

PRE DCR (AUTO DCR)- https://maha.autodcr.com/BPMSClient/Default.aspx

BPMS- https://mahavastu.maharashtra.gov.in

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर AESA
www.aesanagar.com



- इंजिनिअर गणेश अंबादास म्हस्के
BE (Civil)
(System Support Engineer)
Mobile No. 9834856286,9730397597
Email ID- mhaskeganeshagmail.com

# 'प्रॉपर्टी एक्स्पो' मुळे सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती होण्यास हातभार

**आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन**



नगरमध्ये क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पो-२०२४ चे फित कापून उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप. समवेत क्रेडाईचे प्रदेश अध्यक्ष प्रमोद खैरनार, भुमिजा रावत, अमित मुथा आदी.

## नगरमध्ये क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ चे उद्घाटन

नगर - सर्वसामान्यांपासून प्रत्येकालाच स्वतःच्या हक्काच्या घराची इच्छा असते. आयुष्यभर काबाडकष्ट करून कमावलेली रक्कम देऊन स्वप्नातील घर घेतले जाते. अशा वेळी त्यांना विश्वसनीय, गुणवत्ता असलेली घरे क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पो मुळे एकाच छताखाली पहायला मिळतात. आज नगर शहर चारही बाजूंनी विस्तारत आहे. मजबूत रस्त्यांचे जाळे तसेच अन्य पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बांधकाम वाढली आहेत. सुरक्षित व व्यवसाय उद्योग स्नेही वातावरणामुळे बाहेरचे बांधकाम व्यावसायिकही नगरमध्ये मोठे प्रकल्प साकारत आहेत. क्रेडाई अहमदनगरने सातत्याने प्रॉपर्टी एक्स्पो आयोजित करून अनेकांच्या हक्काच्या घराची स्वप्नपूर्तीत योगदान दिले आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

नगरमधील बांधकाम व्यावसायिकांच्या क्रेडाई संघटनेच्या अहमदनगर शाखेने आयोजित केलेल्या क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ चे शुक्रवारी सायंकाळी सावेडी रस्त्यावरील सारडा महाविद्यालयाच्या जागेत आ. जगताप यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, सह सचिव आशिष पोखर्णा, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या होम लोन चिफ मॅनेजर भूमीजा रावत, क्रेडाई अहमदनगरचे अध्यक्ष अमित मुथा, सचिव प्रसाद आंधळे, क्रेडाई अहमदनगरचे प्रेसिडेंट इलेक्ट गिरीश अग्रवाल, उपाध्यक्ष अमित वाघमारे व सागर गांधी, खजिनदार दीपक बांगर, माजी अध्यक्ष संजय गुगळे, विक्रम जोशी, आर्किटेक्ट मयुर कोठारी, प्रकाश मेहता, कमलेश झंवर, अॅड.जयवंत भापकर आदी उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक करताना अमित मुथा यांनी सांगितले की, २० ऑक्टोबर पर्यंत सदर प्रदर्शन चालू असणार आहे. १५० हून अधिक स्टॉल्स असून प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. यात बिल्डर्स व डेव्हलपर्सचे सुमारे ४० स्टॉल तसेच बँक्स, होम फायनान्स कंपनी, बांधकाम मटेरियल ट्रेडर्स आहेत. या प्रदर्शनाला मिळणारा प्रतिसाद प्रत्येकवेळी विक्रमी ठरत आहे. रेरा नोंदणीकृत प्रकल्प एकाच छताखाली असल्याने ग्राहकांना साधकबाधक विचार करून निवडीला भरपूर वाव आहे. नगरकरांनी प्रदर्शनाला भेट देऊन हक्काच्या घराचे स्वप्न साकारावे असे आवाहन त्यांनी केले.

प्रमोद खैरनार म्हणाले, क्रेडाईच्या नगरच्या टिमचे काम अतिशय नियोजनबध्द असते. प्रॉपर्टी एक्स्पोमधून त्याची प्रचीती येते. नगर शहराला व्हिजनरी नेतृत्व लाभल्याने खूप सकारात्मक बदल होत आहेत. व्यापार, उद्योग, व्यवसाय बहरत आहे. परिणामी रियल इस्टेट क्षेत्रही मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे.

भूमिजा रावत म्हणाल्या, क्रेडाईने ग्राहकांसाठी एकाच छताखाली दर्जेदार गृहप्रकल्प आणून निवडीला भरपूर वाव देण्याचे काम केले आहे. अशा उपक्रमांमुळे ग्राहकांचा चांगला फायदा होतो. स्टेट बँक भविष्यातही उपक्रमांना सहकार्य करेल.

आशिष पोखर्णा म्हणाले, अनेकांच्या प्रयत्नातून नगरचा चेहरामोहरा बदलत आहे. नवीन स्कायलाईन तयार होत आहे. काही लाखांपासून ते दोन तीन कोटीपर्यंतचे घरं, प्लॉट याठिकाणी आहेत. याठिकाणी भेट दिल्यावर प्रत्येकाला नगरचे नवीन रूप नक्कीच पहायला मिळेल.

प्रदर्शनात पुण्यातील निवडक बिल्डर्सचेही प्रकल्पही याठिकाणी आहेत. त्यामुळे पुण्यातील प्रकल्पांतही नगरकरांना खरेदी करता येणार आहे. तीन दिवसीय प्रदर्शनात दररोज लकी ड्रॉ काढण्यात येणार असून प्रदर्शनास भेट देणाऱ्यांना बक्षिसे जिंकण्याची संधी असेल. याशिवाय मनोरंजनाचे कार्यक्रम, फूड कोर्ट असल्याने ग्राहकांना सहकुटुंब निवांत वातावरणात आपल्या आवडीनुसार घराचे बुकिंग करता येणार आहे. प्रदर्शनस्थळी बँका, गृह कर्ज देणाऱ्या फायनान्स कंपन्यांचे स्टॉल्सही आहेत. बजेट होम, लक्झुरियस घरे, व्हिन बंगलो, अपार्टमेंट, अंतिम मंजुरीचे प्लॉट ले आऊट, कमिर्शियल कॉम्प्लेक्सचे प्राजेक्ट, फार्म हाऊस, एन.ए. प्लॉट एकाच छताखाली उपलब्ध आहेत. याशिवाय प्रथमच बांधकाम मटेरियल सप्लायर्स व बांधकाम ाशी निगडित लिफ्ट, स्टील, इंटेरियर मटेरियलचेही स्टॉल प्रदर्शनात आहेत. १० लाखापासून ते ३.५० कोटींपर्यंतची घरे, फ्लॅटचे प्रोजेक्ट याठिकाणी आहे. अतिशय योग्य व रास्त दरात पारदर्शी व्यवहारासह दर्जेदार, स्वप्नातील घराच्या पूर्ततेचा आनंद या प्रदर्शनातून ग्राहकांना मिळत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्रसाद आंधळे यांनी आभार मानले.




नवीपेठेतील 'साजन सजनी' वस्त्र दालनाचा ३३ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

# भंडारी परिवाराने व्यवसाय व धर्मप्रेम या दोन्ही गोष्टींची उत्तम सांगड घालत आदर्श निर्माण केला

**महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांचे प्रतिपादन; 'साजन सजनी' वस्त्र दालनाचा वर्धापन दिन साजरा**

नगर - उद्योग, व्यवसाय करताना उत्कर्ष साधायचा असेल तर सचोटी व प्रामाणिकपणा महत्वाचा आहे. या बरोबरच धर्माचरण करून संस्कारित होणेही आवश्यक आहे. 'साजन सजनी'चे भंडारी परिवाराने व्यवसाय व धर्मप्रेम या दोन्ही गोष्टींची उत्तम सांगड घालत आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळेच या परिवाराची भरभराट होऊन समृध्दी प्राप्त झाली आहे. ग्राहकांप्रमाणेच मानवसेवेलाही प्राधान्य देण्याचे कार्य कौतुकास्पद आहे, असे शुभाशीर्वाद आचार्य सम्राट आनंदऋषीजी म.सा.यांचे सुशिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांनी दिले.

नवीपेठ येथील साजन सजनी वस्त्र दालनाला कोजागिरी पौर्णिमेला ३३ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त कुंदनऋषीजी म.सा. यांनी नवकार महामंत्र जाप करून आशीर्वाद दिले. यावेळी आलोकऋषीजी म.सा. यांच्यासह रमणलाल भंडारी, सुभाषलाल भंडारी राजेंद्र गांधी, विजय बोगावत, संजीव गांधी, रमेश पितळे, श्रावक संघाचं संतोष गांधी, अभय लुनिया, संजय गांधी, सुभाष बायड, कमलेश भंडारी, वसंत फिरोदिया, अशोक पटवा, बाळू बोरा, आनंदऋषीजी नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, डॉ. अशोक चंगेडिया, डॉ. सचिन भंडारी, शेखर भंडारी, तसेच विहार ग्रुपचे सदस्य आणि मित्रमंडळी उपस्थित होते.

रमणलाल भंडारी व परिवाराने साधूसाध्वीजींचे आदरपूर्वक स्वागत केले. भंडारी म्हणाले की, साधूसंत येती घरा तोची दिवाळी दसरा असं म्हटलं जाते. आज आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी ते आले हे आमचे भाग्य आहे. आमच्या दालनात रेडिमेड कपडे, साड्यांची भरपूर व्हरायटी सुरूवातीपासून उपलब्ध आहे. ३२ वर्षांच्या वाटचालीत ग्राहकांच्या प्रेमाबरोबरच साधूसाध्वीजींचे आशीर्वाद कायम मिळाले आहे. त्यामुळे ही यशस्वी वाटचाल शक्य झाली आहे. व्यवसाय करताना कायम नीतिमूल्य जपण्याचा प्रयत्न केला असून तीच परंपरा भविष्यातही कायम ठेवू. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही साजन सजनीच्या वर्धापनदिनानिमित्त भंडारी परिवाराला शुभेच्छा दिल्या. आभार प्रवीण भंडारी यांनी मानले.

कुंदनऋषीजी महाराज यांच्या मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 17 ते 24 ऑक्टोबर 2024
SINGHAM 11:30 AM
PHULLWANT 04:45 PM
LIKE ANI SUBSCRIBE 02:15 PM
JIGRA 09:00 AM I 02:00 PM 07:00 PM
VETTAIYAN 08:30 AM I 10:30 PM
BINNY & FAMILY 07:30 PM
THE WILD ROBOT-3D 12:00 PM I 05:00 PM
DEVARA PART-1 07:15 PM
RAJA RANI 11:15 AM
VICKY VIDYA KA WOH WALA VIDEO 08:30 AM I 01:45 PM I 10:30 PM
PAANI 04:55 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

# पै. नाना डोंगरे यांना क्रीडा रत्न पुरस्कार जाहीर



नगर - क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल नगर तालुका तालिम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांना दोस्ती फाऊंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. डोंगरे यांच्या क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना पुरस्काराची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष रज्जाक शेख यांनी केली. श्रीरामपूर येथे २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमात माजी शिक्षणाधिकारी धोंडीराम राजपूत, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुभाष सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते फ्रान्सिस संसारे, मिराबक्ष शेख, ह.भ.प. सुनितातार्इ वाळूंज, साहित्यिक सुरेखा कपाळे आदी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

निमगाव वाघा (ता. नगर) येथील पै. नाना डोंगरे मागील तीस ते चाळीस वर्षापासून क्रीडा क्षेत्रात योगदान देत आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ते विविध स्पर्धा घेत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक राष्ट्रीय कुस्तीपटू घडले असून, नवोदित खेळाडूंना चालना देण्याचे ते सातत्याने प्रयत्न करत आहे. जिल्हा तालिम संघाच्या माध्यमातून राज्यस्तरावर कुस्तीचे संघ व्यवस्थापक म्हणून देखील ते काम पाहत असतात. त्यांची क्रीडा क्षेत्रातील कार्य व योगदानाबद्दल क्रीडा रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे

आपण आजारी नसतानाही
हात-पाय गळून जाणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
कामाचा उत्साह नसणे.
अशक्तपणा वाटणे.
सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
डॉ.सौ. उर्मिला गिते
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. 9422740888

दैनिक नवा मराठा

दिनांक १९.१०.२०२४



# पोटफुगी टाळण्यासाठी...

आरोग्यमंत्र

अपचन किंवा मंदावलेल्या पचनक्रियेमुळे पोटफुगी किंवा पोटात गोळा येणासारख्या समस्या निर्माण होतात. आपली जीवनशैली, आहार-विहार आणि खाण्यापिण्याच्या पद्धती पोटफुगीच्या समस्येला बऱ्याच अंशी जबाबदार असतात. विशिष्ट प्रकारचा आहार किंवा अन्नघटक टाळून तुम्ही ही समस्या दूर करू शकता.

कॅफेनमुळे पचनसंस्था उत्तेजित झाल्याने पोट फुगतं. दुग्धजन्य पदार्थांमुळे त्रास अनुभवणाऱ्या लोकांना दूध घातलेली कॉफी बाधू शकते. कॅफेनचा प्रभाव कमी करण्यासाठी हर्बल टीचा पर्याय निवडा. तुम्ही ग्रीन टीही पिऊ शकता. मिठातल्या सोडियममुळे शरीरात पाणी साठून राहतं आणि पोट फुगल्यासारखं वाटतं. त्यामुळे आहारातलं मिठाचं प्रमाण कमी करा.



काहींना कांदा खाल्ल्यानंतर पोट फुगणं, गॅससारख्या समस्या जाणवतात. अशांनी कांद्याऐवजी काकडी खावी. कोबी, फ्लॉवर, ब्रोकोलीसारख्या भाज्या कच्च्या खाल्ल्याने गॅस होतो. त्यामुळे या भाज्या शिजवून किंवा उकडून खाव्यात. या भाज्यांचं आहारातलं प्रमाण कमी करा.

# स्तन कर्करोगाच्या प्रकरणांत वाढ

आरोग्य विशेष

सध्या महिलांना आपल्या आरोग्याबाबत अधिक सावध होण्याची गरज आहे. ब्रेस्ट कॅन्सरची प्रकरणे सध्या वाढताना दिसत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते स्तनाचा कर्करोग हा सर्वात सामान्य कर्करोगांपैकी एक आहे. दरवर्षी या आजाराची सुमारे २० लाख नवीन रुग्ण नोंदवले जातात. या कॅन्सरबद्दल माहिती नसणे आणि उशीरा ओळखणे या आजारामुळे होणाऱ्या मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

स्तनाचा कर्करोग हा महिलांमध्ये होणारा कर्करोगाचा प्रमुख प्रकार आहे. पुरुषांनादेखील स्तनाचा कर्करोग होऊ शकतो; परंतु हे फार दुर्मीळ आहे. स्तनाचा कर्करोग वेळीच आढळल्यास त्यावर उपचार करता येतात. म्हणून, नियमितपणे स्तनांची तपासणी करणे आणि त्याच्या लक्षणांकडे लक्ष देणे खूप महत्वाचे आहे.



आपल्या शरीरात अनेक पेशी असतात. जेव्हा या पेशी कोणत्याही अवयवामध्ये असाधारणपणे वाढू लागतात, तेव्हा कर्करोगाची शक्यता वाढते. स्तनाच्या कर्करोगात, पेशी एक ट्यूमर बनवतात.

स्तन किंवा काखेखाली गाठ जाणवणे, स्तनाचा आकार बदलणे, निप्पलच्या आतील भागातून स्त्राव, स्तनाग्र आत होणे किंवा कडक होणे, स्तनाच्या त्वचेवर लालसरपणा किंवा पुरळ उठणे, स्तनाखाली किंवा त्याच्या बाजूला सूज येणे, एक स्तन दुसऱ्यापेक्षा वेगळे दिसणे अशी स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे आहेत.

सामान्यत: लोकांना असे वाटते, की स्तनाचा कर्करोग हा अनुवांशिक आहे, याचा अर्थ जर त्याचा कौटुंबिक इतिहास असेल तर पुढच्या पिढीतही तो होतो असा समज आहे; परंतु ते खरे नाही. स्तनाच्या कर्करोगाची केवळ १०-१५ टक्के प्रकरणे अनुवांशिक असतात. आईला, आत्याला किंवा आजीला स्तनाचा कर्करोग झाला असेल, तर अशा महिलांनी स्तनाचा कर्करोग चाचणी करून घ्यावी. ही फक्त रक्त तपासणी आहे. जेव्हा त्याचा परिणाम सकारात्मक येतो, तेव्हा स्तनाच्या कर्करोगाचा धोका ४० टक्क्यांनी वाढतो आणि केवळ स्तनाचा कर्करोगच नाही, तर गर्भाशयाचा कर्करोग होण्याची शक्यताही वाढते.

## गरोदर महिलांना मिळाला दिलासा

नवसंशोधन

साध्याशा रक्तचाचणीद्वारे गरोदरपणातल्या जीवघेण्या ठरू शकणाऱ्या गुंतागुंतीचं निदान करणं शक्य होणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. प्री-एक्लाम्प्सिया असं या विकाराचं नाव आहे. गरोदर महिलेच्या रक्तचाचणीतून या विकाराचं निदान दोन दिवस आधी करण्यात डॉक्टरांना यश आलं. यामुळे या गुंतागुंतीचं वेळेत निदान करणं शक्य होणार आहे. प्री-एक्लाम्प्सिया हा अत्यंत धोकादायक विकार असून यामुळे जगभरात दररोज अनेक महिलांचा मृत्यू होतो, असं आकडेवारी सांगते. या चाचणीसाठी १०३५ महिलांची तपासणी करण्यात आली. गेल्या १०० वर्षांपासून या विकाराचं निदान करण्यासाठी महिलांच्या मूत्रातल्या प्रथिनांची तसंच रक्तदाबाची चाचणी केली जात असे. मात्र नव्या संशोधनामुळे गरोदर महिलांना बराच दिलासा मिळाला आहे.



## होमिओपॅथी आणि दंतविकार

दंतारोग्य

दातदुखी ही सर्वसाधारण समस्या आहे. दात दुखत असला की आपण दंततज्ज्ञाकडे जातो. मात्र होमिओपॅथीमध्येही या विकारावर उपचार आहेत. हिरड्यांच्या जंतूसंसर्गासह इतर विविध दंतविकारांच्या उपचारांमध्ये होमिओपॅथी अगदी प्रभावी ठरते. अर्थात होमिओपॅथी ही पर्यायी उपचारपद्धती असल्याने दातांच्या तीव्र स्वरूपाच्या समस्यांसाठी तुम्हाला दंततज्ज्ञांकडे जावं लागेल. होमिओपॅथिक दंततज्ज्ञ दातांमध्ये पार भरू शकतात. त्यामुळे योग्य दंतविकारांवर योग्य उपचार घेण्यावर भर देणं गरजेचं आहे. होमिओपॅथीचे उपचार केल्यानंतर आराम मिळतोच असं नाही. त्यामुळे त्रास जाणवला तर या औषधांवर विसंबून न राहता चांगल्या तज्ज्ञाला दाखवणं गरजेचं आहे. विश्वासू होमिओपॅथी तज्ज्ञाकडून तुम्ही दंतविकारांवरचे उपचार घेऊ शकता. मात्र आपल्या दंततज्ज्ञाच्या सल्ल्यानेच पुढे जा.



# मायोपियाबाधित मुलांची संख्या ७४ कोटी होणार

आरोग्य चर्चा

अलीकडेच एका अभ्यासातून धक्कादायक बाब समोर आली आहे. कोरोनानंतर मुलांमध्ये मायोपियाच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. आता दर तीन मुलांपैकी एक मायोपियाचा बळी आहे. मायोपिया म्हणजे दूरच्या वस्तू पाहण्यात अडचण येते. २०५० पर्यंत लहान मुलांमध्ये मायोपियाची संख्या ७४ कोटींपर्यंत पोहोचू शकते.

अभ्यासानुसार, मायोपियाची रुग्णसंख्या वाढण्यामागील कारण जास्त स्क्रीन वेळ आहे. कोरोनाच्या काळात लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीत बाहेर पडण्याचा पर्याय नव्हता. त्यामुळे मुलांच्या शिक्षणापासून ते मनोरंजनापर्यंत सर्व काही मोबाईल फोन किंवा कॉम्प्युटरच्या माध्यमातून घडले. टाळेबंदीनंतर मुले त्यांचा बहुतांश वेळ फोन किंवा कॉम्प्युटरसमोर घालवतात. त्यामुळे त्याचा स्क्रीन टाईम खूपच वाढला आहे.



पालकांपैकी एकाला किंवा दोघांनाही मायोपिया असेल तर त्यांच्या मुलांनाही हा आजार होण्याची शक्यता असते. बाहेर खेळणे आणि सूर्यप्रकाशात राहणे यामुळे डोळ्यांना विश्रांती मिळते आणि मायोपियाचा धोका कमी होतो; पण त्याच्या कमतरतेमुळे डोळ्यांना नुकसान होते. कमी प्रकाशात फोन पाहणे किंवा वापरणे यामुळे डोळ्यांवर अधिक ताण येतो. त्यामुळे मायोपिया होऊ शकतो. मायोपिया पूर्णपणे रोखणे कठीण होऊ शकते, विशेषतः जर त्याचा कौटुंबिक इतिहास असेल. काही उपायांचा अवलंब करून त्याचा प्रभाव कमी केला जाऊ शकतो.

मुलांना दररोज किमान २-३ तास बाहेर खेळण्यास प्रोत्साहित करा, संगणक, टॅब्लेट आणि स्मार्टफोन दररोज दोन तासांपेक्षा जास्त वापरु नये, डोळ्यांना नियमित विश्रांती देण्यासाठी २०-२०-२० नियम पाळा. याचा अर्थ, स्क्रीन टाइमच्या प्रत्येक २० मिनिटांनंतर, २० सेकंदांसाठी २० फूट दूर काहीतरी पाहा. अभ्यास करताना मुलांच्या खोलीतील प्रकाश योग्य असल्याची खात्री करा आणि त्यांना अंधारात फोन वापरू देऊ नका.

मुलांचे डोळे नियमितपणे तपासणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मायोपियाची सुरुवातीची लक्षणे शोधून त्यावर योग्य उपचार करता येतील. मुलाच्या आहारात व्हिटॅमिन ए, डी, ई आणि ओमेगा-३ फॅटी सिड भरपूर असावे. डोळ्यांचे काही व्यायाम देखील मायोपिया टाळण्यास मदत करू शकतात. यामध्ये डोळे फिरवणे, डोळे बंद करणे, आराम करणे, दूरच्या वस्तूंवर लक्ष केंद्रित करणे यांचा समावेश असू शकतो.

# झोप उडाली, तर आत्महत्येचा धोका

लक्षात ठेवा

मूल नीट झोपत नसेल आणि रात्रभर बेडवर या अंगावरून त्या अंगावर करीत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. नुकत्याच झालेल्या एका संशोधनात धक्कादायक बाब समोर आली आहे. लहान मूल नीट झोपत नसेल तर आत्महत्येचा धोका वाढतो. कॅलिफोर्नियातील 'स्टॅनफोर्ड सुसाईड प्रिव्हेन्शन रिसर्च लॅबोरेटरी'मध्ये केलेल्या अभ्यासानुसार, १० वर्षांच्या मुलांमध्ये झोपेचा त्रास झाल्यामुळे दोन वर्षांनंतर आत्महत्येचे विचार आणि आत्महत्येच्या प्रयत्नांचा धोका वाढू शकतो. त्याचा धोका २.७ पटीने वाढू शकतो. कॅलिफोर्नियातील 'स्टॅनफोर्ड सुसाइड प्रिव्हेन्शन रिसर्च लॅबोरेटरी'च्या संस्थापक आणि आत्महत्या तज्ज्ञ डॉ. रेबेका बर्नट यांच्या मते झोपेची कमतरता हे १० ते १४ वर्षे वयाच्या आत्महत्येचे एक प्रमुख कारण आहे. या वयात झोपेचा अभाव सर्वात जास्त दिसून येतो. या अभ्यासात अमेरिकेतील २१ ठिकाणी ८,८०० मुलांवर संशोधन करण्यात आले. झोप लागणे किंवा राहणे यात समस्या, जागे होणे, जास्त झोप, झोपेच्या वेळी श्वास घेण्यास त्रास होणे, झोपेच्या वेळी जास्त घाम येणे, अर्ध्या झोपेत वर्तन पद्धती इत्यादी कारणे मुलांच्या पालकांकडून आढळून आली आहेत. पहिल्या डेटा संकलनापासून ९१.३ सहभागींनी आत्मघाती वर्तन अनुभवले नव्हते. आत्महत्येची प्रवृत्ती असलेल्या सहभागींना झोपेच्या कमतरतेचा त्रास होत होता. या अभ्यासात पुढे असे दिसून आले, की नैराश्य, चिंता आणि कौटुंबिक संघर्षाचा इतिहास यासार'या घटकांमुळेही आत्महत्येच्या विचारांना चालना मिळते. या अभ्यासात असे आढळून आले आहे, की दररोज भयानक स्वप्ने पाहिल्याने आत्महत्येचा धोका ५ पटीने वाढतो. आरामदायक कपडे घालून झोपणे, रात्री झोपण्यापूर्वी दात घासणे, झोपण्यापूर्वी वॉशरूममध्ये जाणे, झोपताना मुलाशी बोलणे, मुलाच्या आवडीच्या कविता, कथा किंवा गाणी म्हणणे, झोपेच्या वेळी मुलाला एक कथा ऐकवणे आदी त्यावरचे उपाय आहेत.



## डोळ्यांचा तिरळेपणा

आरोग्य डोळ्यांचं

तिरळेपणा हे 'लेझी आय' या विकाराचं महत्त्वाचं कारण ठरतं. दोन डोळ्यांच्या चष्म्याच्या नंबरमध्ये खूप जास्त अंतर असणं किंवा जाड भिंगाचा चष्मा हे सुद्धा 'लेझी आय'ला कारणीभूत ठरू शकतं. लहान मुलांमध्ये ही समस्या उद्‌भवते. त्यांच्या डोळ्यांची तपासणी केल्यानंतर या विकाराचं निदान केलं जातं. मुलांच्या डोळ्यांची काळजी घेतल्यानंतरही डोळ्यांचे स्नायू कमकुवत असल्यामुळे हा त्रास होऊ शकतो. तिरळेपणाचं नेमकं कारण अद्यापही स्पष्ट झालं नसलं तरी लहान वयातच ही समस्या उद्‌भवत असल्याचं दिसतं. लहान मुलांमध्ये तिरळेपणाची लक्षणं दिसली तर पालकांनी त्यांच्या डोळ्यांवर पट्टी बांधायला सुरूवात करावी.



## पायांना संसर्ग असेल तर...

आजीबाईंचा बटवा

पायांच्या बोटांमध्ये फंगस किंवा जंतूसंसर्ग होणं हा सर्वसाधारण विकार आहे. यात पायांच्या नखांचा रंग काळा, पांढरा किंवा तपकिरी होतो. उपचार केले नाहीत तर हा संसर्ग शरीरात पसरण्याचा धोका असतो. यावर काही घरगुती उपाय करता येतील. बेकिंग सोड्यामुळे जंतूसंसर्गाला कारणीभूत ठरणारी आर्द्रता कमी होते. बूट किंवा मोज्यांमध्ये बेकिंग सोडा ठेवता येईल. बेकिंग सोड्यात थोडं पाणी घालून त्याची पेस्ट बनवा. ही पेस्ट संसर्ग झालेल्या बोटांवर लावा. यामुळे आराम मिळेल. व्हिनेगार हा घटक घराघरात असतो. एक भाग व्हिनेगारमध्ये दोन भाग गरम पाणी घाला. या पाण्यात पाय बुडवून बसा. दररोज ही कृती करा. लसणाचा वापर वेगवेगळ्या व्याधींमध्ये केला जातो. यात जंतूविरोधी गुणधर्म असतात. लसणाचे तुकडे किंवा पेस्ट करून बोटांना लावा.



# धुम्रपानामुळे दृष्टी अधू

आरोग्यभान

धुम्रपानामुळे फुफ्फुसांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. याशिवाय श्वसन, हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित गंभीर समस्या उद्भवतात. ही परिस्थिती डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. भावी पिढ्यांचे आरोग्य धोक्यात येईपर्यंत धुम्रपानाचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतात. धुम्रपानाचे डोळ्यांवर होणारे परिणाम अत्यंत धोकादायक आहेत.

डोळ्यांमध्ये लालसरपणा आणि चिडचिड ही स्थिती अधिक चिंताजनक बनते. धुम्रपानामुळे मॅक्युलर डिजेनेरेशन आणि मोतीबिंदू होऊ शकतात. मोतीबिंदू विकसित होण्याचा एक प्रमुख जोखीम घटक हा आहे की धुम्रपानामुळे दृष्टी कमी होऊ शकते. धुम्रपानाचे धोके केवळ सिगारेट ओढणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित नाही; अशा निष्क्रिय धुम्रपानामुळे आजूबाजूच्या लोकांनाही त्रास सहन करावा लागतो. अशा घटकांचा धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तीवर तसेच विशेषत: तरुण व्यक्तीवर धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीपेक्षा जास्त परिणाम होण्याची शक्यता असते. निष्क्रिय धुम्रपानामुळे मुलांमध्ये मोतीबिंदूसारख्या डोळ्यांच्या समस्या उद्भवू शकतात. धूम्रपानामुळे मधुमेहाशिवाय डायबेटिक रेटिनोपॅथीचा धोका वाढतो. ही अशी स्थिती आहे, जिथे रक्तातील साखरेची पातळी वाढल्याने रेटिनातील वाहिन्यांना नुकसान होते. डायबेटिक रेटिनोपॅथीचा धोका कमी करण्यासाठी आणि दृष्टी टिकवून ठेवण्यासाठी मधुमेही रुग्णांना धूम्रपान सोडण्यास प्रोत्साहित करणे महत्त्वाचे आहे. गरोदर माता आणि भावी पिढ्यांसाठी धुम्रपानामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात.



सर्वांगीण लोककल्याणाचे रक्षण करण्यासाठी आपण धुम्रपानमुक्त वातावरणासाठी प्रयत्न केले पाहिजे. धूम्रपान बंद करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांचे समर्थन केले पाहिजे. धूम्रपानामुळे डोळ्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करून, धूम्रपान बंद करण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देऊन, तसेच तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून आपण आपली दृष्टी सुरक्षित करू शकतो.

# सोरायसिसवर धृतकुमारी प्रभावी!

आयुर्वेद आणि विकार

सोरायसिस हा एक त्वचारोग आहे. आयुर्वेदानुसार शरीरात वात आणि पित्ताचं प्रमाण वाढल्याने टिश्यूंमध्ये विषारी घटकांची निर्मिती होते आणि हे घटक सोरायसिसला कारणीभूत ठरतात. त्वचेचा दाह, खाज, अंगावर पुरळ उठणं, त्वचा लाल होणं ही या विकाराची लक्षणं आहेत. पौष्टिक आहाराचा अभाव आणि तेल, तुपासारख्या स्निग्ध पदार्थांचं आहारातलं प्रमाण नगण्य असेल तर हा विकार होण्याची शक्यता वाढते. त्वचेला पुरेसा ओलावा मिळत नसला तरी तुम्हाला त्रास होऊ शकतो. जास्त वेळ उन्हात राहिल्याने त्वचा कोरडी पडते आणि सोरायसिसची समस्या निर्माण होते.



या विकारावर काही आयुर्वेदिक उपचार करता येतील. अक्रोड पाण्यात उकळून हे पाणी सोसायसिस झालेल्या भागावर लावा. सोरायसिस झालेला भाग केळ्याच्या पानांनी बांधून ठेवा. भांडंभर पाण्यात १५ ते २० तीळ टाकून रात्रभर ठेवा. सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्या. यामुळे आराम मिळेल. त्वचाविकारांवर धृतकुमारी हा अत्यंत प्रभावी उपाय ठरतो. सोरायसिस झालेल्या भागावर या वनौषधीचा गर नियमित लावा किंवा दिवसातून दोन वेळा गर खा. या विकाराची तीव्रता अधिक वाटत असेल तर आयुर्वेदतज्ज्ञांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. आयुर्वेदिक उपचारांमध्ये रक्त आणि टिश्यूंच्या शुद्धिकरणावर भर दिला जातो. यासाठी आहारात काही बदल सांगण्यात येतात. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि त्वचेतले टिश्यू बळकट होतात.

# केस ओले ठेवून झोपू नका

आपण कुठे चुकतो?

केस ओले ठेऊन झोपू नये, असा सल्ला दिला जातो. मात्र यामुळे होणाऱ्या त्रासाचे फारसे पुरावे उपलब्ध नसल्यामुळे या मुद्द्याकडे डोळेझाक केली जाते. प्रत्यक्षात मात्र ओल्या केसांमुळे बराच त्रास होऊ शकतो. तुम्हीही सकाळी लवकर जायचं असल्यामुळे रात्री केस धूत असाल आणि ओल्या केसांनीच झोप असाल तर सावध व्हा. यामुळे तुमचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं.




आहाराच्या चुकीच्या सवयी, वाढलेलं प्रदूषण आणि इतर कारणांमुळे केस गळण्याचं प्रमाण खूप वाढलं आहे. त्यातच केस ओले असताना झोपलात तर ते जास्त प्रमाणात तुटू शकतात. ओले केस आधीच खूप नाजूक असतात. त्यातच झोपेतल्या हालचालींमुळे ते जास्त गळतात. उन्हाळ्यात काहीजण एसी लावून झोपतात. एसीत ओले केस घेऊन झोपल्याने थंडी वाजते आणि मग ताप, सर्दी, खोकला असे आजार होऊ शकतात. ओल्या केसांना आकार देता येतो. झोपेत आपले केस वेडेवाकडे होतात. गुंतून बसतात. यामुळे केस विंचरताना बराच त्रास होतो आणि वेळही जातो. त्यामुळे रात्री केस वाळवून झोपलेलं केव्हाही चांगलं. केस ओले असताना झोपल्यामुळे रोगप्रतिकारक क्षमता कमी होते असं म्हणतात. यामुळे सर्दी, खोकला, ताप असे विकार वरचेवर उद्‌भवायला सुरूवात होते. आर्द्रता आणि ओलावा हे वातावरण बॅक्टेरियांच्या वाढीसाठी पोषक ठरतं. ओल्या केसांमुळे उशीवर बॅक्टेरिया वेगाने वाढतात. उशीचे अभ्रे धुवून काहीही साध्य होत नाही. कारण पाणी आणि आर्द्रता उशीच्या आत शिरते आणि तिथे बॅक्टेरिया वाढू लागतात. याच ओलाव्यामुळे डोक्यात बॅक्टेरियांची वाढ होते आणि कोंड्याची निर्मिती होते. ओल्या केसांमुळे केसांच्या मुळाशी असलेल्या नैसर्गिक तेलांचं प्रमाण घटतं उशीवरच्या बॅक्टेरियांमुळे चेहऱ्यावर पुरळ येऊ शकतं.

# क्रश सिंड्रोम म्हणजे काय?

व्याधी विचार

स्नायूंच्या विशिष्ट गटावर दीर्घकाळपर्यंत बराच दाब पडला तर क्रश सिंड्रोम हा विकार होऊ शकतो. या दाबामुळे स्नायूंचं तीव्र स्वरूपाचं नुकसान झालं तर मायोग्लोबिन नावाचं विषारी प्रथिन तसंच पोटॅशियम आणि फॉस्फरस हे घटक मोठ्या प्रमाणावर बाहेर पडतात. सर्वात जास्त दाब असलेल्या स्नायूंमधून हे विषारी घटक बाहेर पडतात आणि संपूर्ण शरीरात पसरतात. हे विषारी घटक रक्तात शिरून ह्दयापर्यंत पोहोचतात. या घटकांमुळे बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. मूत्रपिंड निकामी होणं, हृदयविकार आणि रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. मूत्रपिडांमधून घाण बाहेर टाकणाऱ्या नळीत अडथळे आल्यामुळे ते निकामी होतात. यामुळे मूत्रपिंडातल्या पेशींचं नुकसान होतं.



स्नायूंना झालेल्या दुखापतीशिवाय इतर कारणांमुळेही क्रश सिंड्रोम होऊ शकतो. यामागे काही अनुवंशिक कारणंही असू शकतात. कर्बोदकांच्या पचनाशी संबंधित काही जन्मजात दोष असले तर क्रश सिंड्रोम होऊ शकतो. खूप दगदग झाल्यामुळे किंवा हिट स्ट्रोकमुळेही क्रश सिंड्रोमना निमंत्रण मिळतं. कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी देण्यात येणारी औषधंही क्रश सिंड्रोमला कारणीभूत ठरू शकतात. क्रश सिंड्रोमची लक्षणं स्पष्टपणे दिसून येतात. त्यामुळे या विकाराचं निदान करणं डॉक्टरांसाठी कठीण नसतं. स्नायूंना धक्का पोहोचल्यामुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यावर परिणाम होतो. परिणामी, रूग्णाची शुद्ध हरपते किंवा तो कोमामध्येही जाऊ शकतो. रक्तात वाढलेल्या पोटॅशियममुळे स्नायू कमकुवत होतात. त्वचा थंड पडते. नाडीची गती वाढणं, मूत्राचं प्रमाण कमी होणं क्रश सिंड्रोमबाधित भागात वेदना न जाणवणं अशी या विकाराची सर्वसाधारण लक्षणं आहेत.

या विकाराचं निदान करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या चाचण्या केल्या जातात. त्यात युरिन मायोग्लोबिन, सिरम सीपीके आणि रसायनांशी संबंधित चाचण्या केल्या जातात. क्रश सिंड्रोमचं निदान झाल्यानंतर डॉक्टर उपचारांना सुरूवात करतात. रूग्णाला जास्तीत जास्त पाणी पाजण्याचा प्रयत्न होतो. इतर द्रव पदार्थ दिले जातात. यामुळे रक्तातलं आम्ल विरघळायला सुरूवात होते आणि मूत्रपिंडातलं मायोग्लोबिन बाहेर पडू लागतं. यामुळे शरीराला भरपूर प्रमाणात द्रव पदार्थ मिळतात तसंच प्रत्येक टिश्यूला ऑक्सिजनचा पुरवठा होतो. वैद्यकीय उपचार सुरू होण्याआधी प्रथमोपचारांनी रुग्णाला दिलासा देता येतो. रुग्णाचं डोकं, पोट आणि छातीवरचा अतिरिक्त दबाव काढून टाकावा लागतो.

अपघात झाल्यानंतर क्रश सिंड्रोमचा धोका बराच वाढतो. त्यामुळे एखादा अवयव निकामी झाला असेल तर तो निकामी करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो. इंजेक्शनच्या माध्यमातून द्रव पदार्थ नसांमध्ये सोडावे लागतात. नुकसान झालेले टिश्यू शस्त्रक्रिया करून लगेच काढून टाकावे लागतात.

## 'सिद्धार्थ वाणी'

परमपूज्य श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौभाग्यश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है।



\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

जबरदस्त सामर्थ्याने हल्ला करणारा सिंह ज्याने हत्तीचे डोके फाडले आहे आणि पृथ्वी रक्ताने माखली आहे असा पराक्रमी सिंहही पराक्रमी परमेशवराचया चरणांवर अवलंबून असलेल्या भक्त राजासमोर बकरी सारखा बसला आहे. भागवंताचे दोन्ही पाय अचल पर्वताप्रमाणे अचल व अडील आहेत, वनराज पर्वत राजीवर अवलंबून आहे आणिा भक्तराजा परमेश्वराच्या चरणांवर अवलंबून आहे. दोन्ही अचल आहेत. भक्त क्रोध आणिा भयमुक्त असतो आणि अशा शांतीप्रिय भाक्ताच्या जवळ येऊन सिंहही आक्रमक झाला नाही, परमेश्वराच्या चमत्कारि चरणांचा आश्रय किती प्रभावशाली आहे, भयंकर सिह पुढे येतो आणि हत्तीवर हल्ला करतो आणिा पराभूत करू शाकतो तर माणसाचा नाशा करणे हे त्याच्या डाव्या पंजाचे काम आहे. असा भयभीत आणिा संतापलेला सिंह सुद्धा भागवंताच्या चरणी आश्रय घेतल्यावर भयंकर सिंह देखील भक्ताला बकरीसारखाा साधा दिसतो, आणि सिंह भक्ताला दिव्य पुरुषासारखा भासतो, भावनांमध्ये अद्‌भूत बदल होतो. राग आणि अभिमान ऐवजी क्ष्मा आणिा निर्भयता निर्माण होते. सिंहाचा आधार घेत अभयदान आचार्यश्रीजींनी निर्भय चैतन्य जागृत होण्यासाठी भगवंताच्या चरणी भक्तीची सुंदर फुले अर्पण केली आहेत.

सिंह हा स्वभावाने शांत आणिा सौम्य प्राणी आहे, वाघ, बिबट्या इ. आणि इतर भक्षक प्राणी सारखो फसवे नाहीत. लिओचे चालणे देखील अद्वितीय आहे, संतांच्या सेवेत बसून सिंह सुध्दा आपल्या धर्माची सेवा आणिा पूजा करतो, कर्नाटक केसरी परम तपस्वी श्री गणेशमलजी म.सा. च्या सेवेत सिंह राहायचा त्यामुळे माणसांवर अचानक हल्ला होत नाही. भूक लागल्यावर तो लहान-मोठ्या प्राण्याची शिकार करतो, माणसांपासून शक्यतो दूर राहतो, जेव्हा मानव त्याची छेड काढतो आणि त्याची शिकार करतो तेव्हा तो कमकुवत होतो आणि हल्ला करू लागतो. भगवान महावीरांची स्तुती करताना आर्य सुधर्मस्वामीजी प्रभूला सोहोमीयाणं सांगितले आहे अर्थात हे प्रभो! तुम्ही हिरणो आणिा समस्त वनपशुच्या मध्य सिंहच्या समान महापराक्रमी आहे!

सिंह भय निवारक संपुट - अहो पुरिससिहाणं प्रभो! माणसामध्ये तू सिंहासारखा पराक्रमी आहेस मी तर डरपोक आणिा निष्पाप आहे, कुत्र्यालाही घाबरण्याची माझी वृत्ती, सिंहाचा सामना कसा करू शकेल? मग मी ऐकले आहे की सिंह हा जंगलाचा राजा आहे त्याची ताकद हत्तीपेक्षा जास्त आहे, एका सिंहात ५०० हत१तींचे बळ असते असे म्हणतात. सिंह समोरुन हल्ला करतो हे परमेश्वरा! मी तुझ्या शारणात आहे मी तुझ्या अचल, स्थिर, शांत निर्भय चरणावर अवलंबून आहे, आता मला सिंहापेक्षा जास्त शक्ती मिळाली आहे. बलाढ्य सिंहसुद्धा माझ्या समोर पाळीव कुत्र्याप्रमाणे शांत बसला आहे. आता मला कोणत्याही जंगली प्राण्याची भीती वाटत नाही. धर्माभेमानो आणि धार्मिक श्री मानतुंगाचार्य यांची चेतना आदिनाथा सारखी झाली मग हत्ती, सिंह, साप वगैरेची भीती आपोआपच निघून गेली हे परमेश्वरा माझ्यातही तूच आहेस, मला दुसरे कोणी दिसत नाही. कामदेव, चुलणीपिता इ. भक्तासमोर खोट्या देवांनी हत्ती, सिंह आणि नागाचे रुप घेऊन त्यांना घाबरण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या भक्तांना थोडाही त्रास झाला नाही. ते फक्त तुझ्या ध्यानात मग्न राहिला, मलाही फक्त तुमचाच आश्रय आहे. माझ्या मनात तुम्ही आहात, मला अन्य कोणीच दिसत नाही. मला खात्री आहे की रागाच्या रुपात असलेला सिंह माझ्या शुत्रू आणि शांत आत्मावर हल्ला करू शकणार नाही.

**गाथा (३९) -**

भित्रेभ कुम्भ-गल-दज्ज्वल-शोणिताक्त
मुक्ता-फल-प्रकर-भुषित-भूमिभागः
बद्धक्रम, कृमगत हरिणाधिऽपि
जाक्रामति क्रम-युगाचल-संमितं ते ।।३९।।

**अर्थ - सिंह भय निवारक -** ज्याने प्रचंड हत्तीचे कुंभस्थल तोडून रक्ताने माखलेल्या तेजस्वी मोत्यांच्या ढिगाऱ्यांनी भूमी सुशोभित केली आहे, असा उग्र सिंहसुद्धा तुझ्या रुपाने पर्वताचा आश्रय घेणाऱ्या भक्तासमोर धरणासारखा होतो, पाय दिले तरी ददपक भक्तावर आघात होतो, म्हणजे तुमचा संशय रहित राहतो.

**उत्तरध्याय सुत्र -**

**उत्तरध्यायसुत्राच्या 'सोळाव्या अध्ययनात' -** समाधीचे वर्णन केले आहे जो ब्रम्हचर्य व्रताची उपासना करतो तो इतर सर्व नियमांची, तपश्चर्या, विनयशील सत्य, संयम इ. ब्रह्मचर्य हा व्रतांचा मुकुट आहे. इतकं की ब्रह्मा ही देव निर्माण करणारी महाशक्ती आहे. मन, बुध्दी आणिा हृदयात ब्रम्हचर्य प्रस्थापित करण्यासाठी आणि ब्रम्हचर्य पाळण्यासाठी दहा 'वड' सांगितले आहेत त्यांना समाधी स्थाने म्हणतात.

अध्ययन सतरावा - ह्या अध्ययनात पाप त्यागाची प्रक्रिया आणिण लक्षणो स्पष्ट केली आहेत. ज्ञान, तत्वज्ञान, चारित्र्य, तपश्चर्या आणि वीर्य पाच समिती, तीन रहस्ये या पाच आचारांचे जो योग्य प्रकारे पालन करतो तोच श्रेष्ठ श्रमण होय, जी व्रत करणे, खोडणे, अभ्यास करणे, परिश्रम करणे इ. श्रमण चक्र पाळत नाही. तो अतार्तिक होऊन दिवसभर अन्न, झोप आणि शरीराचे पोषण यात मग्न होतो. शिक्षकाकडून धडे घेण्याऐवजी त्यांना प्रतिसाद न देता, गुरुचा त्याग केला आणि पुन्हा पुन्हा टोळ्या बदलतात.

सतराव्या अध्ययनात जो आत्मसंयमाकडे दुर्लक्ष करतो आणि आपल्या शिक्षकांच्या सूचनांचे पालन करत नाही, अपेक्षा ठेवतो त्याला पापी व्यक्ती म्हणून वर्णन केले आहे. पण त्या उलट सुश्रमण कसे घडते हे ह्या आठराव्या अध्यनात पहाणार आहोत. या आठराव्या अध्ययनाचे नाव आहे - संयतिय, राजा सन्याती हरणाची शिकार करण्यासाठी जंगलात जातो आणि ध्यानस्त ऋषीजवळ गेल्यावर तो घाबरतो आणि मेलेल्या हरिणीला पाहून ऋषींना राग आला तर क्षणातच तो त्याला जाळून टाकेल, या भीतीने तो घाबरला आणिा थरथर कापायला लागला, मुनिराजांनी आपले मन मोकळे करुन राजाला संरक्षण दिले आणि वनातील प्राण्यांना संरक्षण देण्याचा संक्षिप्त सलला देतानाच आपल्या कुटुंबातील सदस्यांची असहायता आणिा जगाच्या नश्वरतेची माहिती राजाला दिली. राजा भ्रमनिरास होतो आणि निर्गंध प्रवाज्य सवीकारतो अंत समय संजय मुनि आत्मशुद्धि करुन अंतिम क्षणी सिद्धपट प्राप्त होते.

**- सौ. सविता चोरडिया**

# आष्टी-नगर-पुणे शटल सेवा सुरु होण्याच्या मागणीसाठी रेल्वे स्टेशनसमोर 'सूर्यनामा'

नगर - आष्टी-नगर-पुणे शटल रेल्वे सेवा सुरु होण्याच्या मागणीसाठी शनिवारी (दि.१९ ऑक्टोबर) शहरातील रेल्वे स्टेशन समोर वंदे मराठवाडा डेमु एक्सप्रेसचा पीपल्स हेल्पलाइन व भारतीय जनसंसदेच्या वतीने सूर्यनामा करुन सुरु रेल्वे प्रशासनातील अनागोंदीचा निषेध नोंदविण्यात आला.




आष्टी-नगर-पुणे शटल रेल्वे सेवा सुरु होण्याच्या मागणीसाठी नगर स्टेशनसमोर सूर्यनामा करण्यात आला.

प्रारंभी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन आंदोलनाला प्रारंभ करण्यात आले. हातात तिरंगा ध्वज घेऊन कार्यकर्त्यांनी आष्टी-नगर-पुणे शटल रेल्वे सेवा सुरु होण्यासंदर्भात घोषणाबाजी केली. या आंदोलनासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सत्याग्रही मार्गाने झालेल्या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, जाफर भाई (कर्जत), भाऊसाहेब सुद्रिक (कोपर्डी), भारतीय जनसंसदेचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, शहराध्यक्ष रईस शेख, प्रकाश थोरात, अशोक भोसले, शाहीर कान्हू सुंभे, बाळासाहेब पालवे, शेख अल्ताफ रहीम, संदेश रफारिया, वीर बहादूर प्रजापती, सुधीर भद्रे, बबलू खोसला, नारायण रोडे, सोमनाथ घाडगे, विजय शिरसाठ, राम धोत्रे, सुनिल टाक, अरुण खिची आदी सहभागी झाले होते.

नगर-पुणे अंतर १०५ किलोमीटर आहे. आष्टी-नगर अंतर ६५ किलोमीटर आहे. या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची गेली तीस वर्षापासून कार्यान्वीत करण्याचे काम सुरु आहे. परंतु हा रेल्वे मार्ग आज ही पूर्ण झालेला नाही. मागच्या वर्षी नगर-आष्टी रेल्वे मार्ग सुरु करण्यात आला. त्यावर नगर-आष्टी डेमो रेल्वे सुरू झाली, परंतु प्रवाश्यांनी प्रतिसाद दिला नाही. किमान ६० कोटी रुपयांची डेमो गाडी नगरच्या रेल्वे स्टेशनवर गेली अनेक महिने गंजत ठेवण्यात आली आहे. या गाडीवर दररोज अडीच लाखापेक्षा जास्त खर्च होत असल्याचे रेल्वे प्रशासनाचे म्हणने असून, यावरुन एकंदरीत रेल्वे प्रशासनाची अनागोंदीने समोर येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

पुणे-नगर हे अंतर १०५ किलोमीटरचे आहे. हजारोंच्या संख्येने नगरकर पुण्याला ये-जा करतात. पुण्याला जाण्यासाठी निर्माण झालेल्या वाहतुक कोंडीमुळे तीन ते चार तासापेक्षा अधिक वेळ लागत आहे. पुण्या जवळील २० किमीटरच्या रस्त्यावर प्रचंड वाहतुक कोंडी असते. त्यामुळे नगर-पुणे डेमो ट्रेन सुरू व्हावी, अशी नगरकरांची गेली तीस वर्षांची मागणी आहे. परंतु रेल्वे प्रशासन या बाबीकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहे. नगर जिल्ह्याचे आमदार खासदारांना लोकांच्या प्रश्नांमध्ये रस नव्हता, त्यामुळे प्रशासनातील वांझोटेपणा व रेल्वे प्रशासनातील अनागोंदीने नगर-पुणे डेमू ट्रेन आज पर्यंत सुरू झालेली नसल्याचा संघटनेच्या वतीने आरोप करण्यात आला.

लोकांना आष्टी-नगर-पुणे हा प्रवास सुखाचा होईल आणि हजारो लोकांची त्यामुळे सोय होणार आहे. नगर-पुणे महामार्गावरील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या डेमो ट्रेनमुळे सर्वच शैक्षणिक, व्यावसायिक, उद्योग आदी कारणांसाठी जोडला जाईल. या गाडीला चार दोन मालगाडीचे डबे लावून शेतकऱ्यांसाठी वंदे किसन मालगाडी सुद्धा यातून उपलब्ध होणार आहे. मागासलेल्या मराठवाड्याला आर्थिक न्याय देण्यासाठी ही गाडी अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. पुढे ही गाडी पुणे-नगर-आष्टी-बीड-परळी अशी सुरू करता येईल. त्यासाठी नगर-परळी रेल्वे मार्ग बांधण्याचा ध्यास रेल्वे खात्याने घेण्याची मागणी करण्यात आली.

शासन प्रशासनातील मंडळी सत्ता, संपत्ती आणि खोट्या प्रतिष्ठेमध्ये अडकून पडली आहे. त्यामुळे आष्टी-नगर-पुणे डेमू रेल्वे चा बट्ट्याबोळ झालेला आहे. सूर्याच्या प्रकाशात रेल्वे प्रशासनाचा जाहीर पंचनामा करण्याचा प्रयोग सूर्यनामातून करण्यात आला. लोकांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष करून त्यांच्या गरजा बाजूला ठेऊन आणि रेल्वे प्रशासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान जनतेच्या मागण्या मान्य न केल्यामुळे होत असल्याची बाब सूर्यनामातून जनतेसमोर दाखवून देण्यात आली.

भारताचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव मराठवाड्याला न्याय देण्यासाठी वंदे मराठवाडा आष्टी-नगर-पुणे डेमू ट्रेन युद्ध पातळीवर सुरू करण्याची अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाकडून यासंबंधी कारवाई न झाल्यास रेल्वे मंत्र्यांच्या प्रतिकात्मक पुतळा धावत्या रेल्वे समोर टाकून निषेध नोंदविला जाणार असल्याचा इशारा संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे. या मागणीचे निवेदन रेल्वेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## 'अहमदनगर फुटबॉल सुपर लीग (सिझन ३)'चे 'नमोह क्लब'तर्फे २३ व २४ नोव्हेंबरला आयोजन

नगर - नमोह फुटबॉल क्लबच्यावतीने २३ व २४ नोव्हेंबर रोजी अहमदनगर फुटबॉल सुपर लीग (सिझन ३) चे आयोजन करण्यात आले आहे. अहमदनगर क्लबच्या मैदानावर मोठ्या फुटबॉल लीगच्या धर्तीवर ही स्पर्धा होणार आहे. १५ वर्षाखालील खेळाडूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. नोंदणी केलेल्या खेळाडूंची लिलाव पध्दतीने संघात निवड केली जाणार आहे. स्पर्धेपूर्वी सर्व खेळाडूंना तज्ज्ञांकडून दहा दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन व व्यासपीठ देण्यासाठी ही लीग स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती नमिता फिरोदिया यांनी दिली.

नगरच्या क्रीडा क्षेत्राला चालना मिळण्यासाठी नमोह फौंडेशनने नेहमीच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करतात. फुटबॉल हा लोकप्रिय क्रीडा प्रकार आहे. नगरमधील अनेक गुणी खेळाडून या खेळात पारंगत आहेत. त्यांच्यासाठी ही सुपर लीग चांगले व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धेत एकूण ८ संघांना प्रवेश देण्यात येणार आहे. ५ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत नोदंणी केलेल्या खेळाडूंना त्यांच्या क्षमतेनुसार ग्रेडस देण्यात येतील. ९ नोव्हेंबर रोजी नोदंणी केलेल्या खेळाडूंना इंडिया खेलो फुटबॉल निवड चाचणी मध्ये सहभागी होता येईल. नगरमधील इंडिया खेलो फुटबॉल निवड चाचणी मध्ये निवड झालेल्या खेळाडूंना इंडिया खेलो फुटबॉल प्री फायनल स्पर्धेत तसेच दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय फायनल स्पर्धेत खेळण्याची संधी मिळेल. संघ निवड लिलाव ११ नोव्हेंबर रोजी होईल. प्रत्येक संघासाठी स्वतंत्र व्यावसायिक प्रशिक्षक दिला जाणार आहे. प्रत्येक संघातील खेळाडूंना उत्तम दर्जाची जर्सी दिली जाणार आहे. सुपर लिग प्रत्येक खेळाडूला अनुभवाची शिदोरी देणारी ठरेल तसेच भविष्यात फुटबॉलमध्ये त्यांना आणखी प्रगती करता येईल.

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : ९८३४०२००१७. प्रवेश फॉर्म नमोह क्लब मैदानावरही उपलब्ध असतील.




चित्रपट अभिनेत्री व भारतातील एकमेव मिसेस वर्ल्ड डॉ. आदिती गोवित्रिकर यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे संस्थापक प्रजापिता ब्रह्मा बाबा यांच्या माऊंट अबू येथील पांडव भवन मध्ये असलेल्या समाधीला शांती स्तंभाला भेट दिली. यावेळी बी के डॉ. दीपक हरके.

# शाळा-महाविद्यालयातून होणार लोकशाहीचा जागर; दिपोत्सवात लोकशाहीच्या उत्सवाबाबत जनजागृती

नगर - विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी जनजागृती उपक्रमात सहभागी होणार असून दिवाळीच्या निमित्ताने आकाश कंदील आणि शुभेच्छा पत्रांच्या माध्यमातून कुटुंबिय आणि नातेवाईकांना मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे. नागरिकांनाही या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या अहिल्यानगर जिल्हा स्वीप समिती आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून 'लोकशाहीचा दीपोत्सव' या उपक्रमाचे २१ ते २६ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थी आगळ्यावेगळ्या पद्धतीने मतदार जागृती करणार आहेत. 'आमचा आकाश कंदील - आमची विधानसभा' या संकल्पनेवर आधारीत स्पर्धेचे यानिमित्ताने आयोजन करण्यात आले आहे.

पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून 'आई-बाबा तुम्ही लोकशाहीची पणती हाती धरा,विधानसभेच्या निवडणुकीत जरूर मतदान करा', 'आपले मतदान २० नोव्हेंबर रोजी आहे. कृपया विसरू नका', 'अहिल्यानगरीच्या मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' असे संदेश यंदाच्या दिवाळीत विद्यार्थ्यांनी बनविलेल्या आकाश कंदीलांवर दिसतील. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्यासोबत त्यांना लोकशाही प्रक्रीयेचा एक घटक म्हणून काम करण्याचा आनंदही या उपक्रमातून मिळणार आहे.

'हॅप्पी दिवाळी - हॅप्पी लोकशाही' या भेटकार्ड स्पर्धेअंतर्गत पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून तयार करण्यात आलेले भेटकार्ड आणि शुभेच्छा पत्रे घरोघरी पाठविण्यात येणार आहेत. अंगणात सजणारी विविधरंगी रांगाळी आता लोकशाहीच्या रंगातही रंगलेली दिसेल. 'रंग लोकशाहीचे' या रांगोळी स्पर्धेत विद्यार्थी घराचे अंगण, शाळा किंवा सार्वजनिक ठिकाणी रांगोळी काढून मतदानाचे महत्व सांगणार आहेत. विद्यार्थ्यांच्या हातावर रंगणाऱ्या मेहंदीद्वारेदेखील मतदान, निवडणूक, लोकशाही, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, बोटावरील मतदानाची शाई आदी संकल्पना मांडण्यात येणार आहेत.

चारही स्पर्धांसाठी पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी, अकरावी व बारावी, वरिष्ठ महाविद्यालय आणि खुला गट असे पाच गट असून आकाशकंदील, भेटकार्ड/शुभेच्छा पत्रे, रांगोळी व मेहंदी या चारही स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या कलाकृतीचे एक छायाचित्र व कलाकृतीबरोबर सेल्फी असे दोन छायाचित्र ५ नोव्हेंबर पर्यंत ९००२ १० ९००३ या देशातील पहिल्या अहिल्यानगर स्वीप केअर व्हाट्सअप क्रमांकावर स्वतःचे नाव, पूर्ण पत्ता, शाळा/ महाविद्यालयाचे नाव व गटाचा उल्लेख करून पाठवायचे आहेत.ही छायाचित्रे समाजमाध्यमांवरही पोस्ट करावीत. सर्व गटांसाठी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. अधिकाधिक विद्यार्थी आणि नागरिकांनी स्पर्धेत आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन स्वीप समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## नगरमध्ये अल्पवयीन मुलीची छेड काढत केली मारहाण

### चौघांविरूध्द विनयभंग, पोक्सो, मारहाणीचा गुन्हा दाखल

नगर - शाळेत निघालेल्या अल्पवयीन मुलीची छेड काढत तिला मारहाण करण्यात आल्याची घटना गुरूवारी (दि.१७) सकाळी पावणे दहाच्या सुमारास नगर शहरात घडली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून चौघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात विनयभंग, पोक्सो, मारहाण आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिकेत मार्कस खंडागळे, विवेक मार्कस खंडागळे, जिवन खंडागळे, शेवण खंडागळे (सर्व रा. लालटाकी, अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी गुरूवारी सकाळी शाळेत जात असताना पावणे दहाच्या सुमारास अनिकेत खंडागळे याने तिचा हात पकडून 'आमच्या सोबत फिरायला चल' असे म्हणून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. फिर्यादीने त्याला नकार दिला असता त्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. हाताच्या नखाने ओरखडे ओढले. पीडिताने सदरची घटना आई, वडिल व भावाला सांगितली. ते सर्व जण जाब विचारण्यासाठी अनिकेतच्या घरी गेले असता त्यांना अनिकेतसह विवेक खंडागळे, जिवन खंडागळे, शेवण खंडागळे यांनी शिवीगाळ, दमदाटी केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पीडिताच्या कुटुंबाने गुरूवारी दुपारी तोफखाना पोलिसांना माहिती देत पीडिताच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक पुनम श्रीवास्तव करत आहेत.

## आदर्श आचारसंहिता लागू होण्याच्या ४८ तासात जिल्ह्यातील २४ हजार ९६९ जाहिराती काढल्या

नगर - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासूनच्या ४८ तासामध्ये जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच खाजगी मालमत्तेवरील भित्तीपत्रके, घोषणा फलक, रंगविलेल्या जाहिराती, कोनशिला, झेंडे काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसरातील ११ हजार ६४१, सार्वजनिक ठिकाणच्या ९ हजार ५०२ तर खाजगी मालमत्तेवरील ३ हजार ८२६ अशा एकूण २४ हजार ९६९ जाहिराती काढण्यात आल्या असल्याची माहिती आचारसंहिता कक्षातर्फे देण्यात आली आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८६४, सार्वजनिक ठिकाण ३९१ तर खाजगी मालमत्तेवरील ३२० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.

संगमनेर मतदारसंघ कार्यालय परिसर ८१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ८८, खाजगी मालमत्तेवरील २५५, शिर्डी मतदारसंघ कार्यालय परिसर ९१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ६४१, खाजगी मालमत्तेवरील ३५१, कोपरगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ९५४, सार्वजनिक ठिकाण ६१९, खाजगी मालमत्तेवरील ३०९, श्रीरामपूर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १३१, सार्वजनिक ठिकाण १ हजार ५५० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.

नेवासा मतदारसंघ कार्यालय परिसर ३२४, सार्वजनिक ठिकाण ५७७, शेवगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ८५४, सार्वजनिक ठिकाण ९३७, खाजगी मालमत्तेवरील १ हजार ७२३, राहुरी मतदारसंघ कार्यालय परिसर २५४, सार्वजनिक ठिकाण १४१, खाजगी मालमत्तेवरील २१, पारनेर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १२३, सार्वजनिक ठिकाण ९७८, खाजगी मालमत्तेवरील ४९५ जाहिराती काढण्यात आल्या.

अहमदनगर शहर मतदारसंघ कार्यालय परिसर २८६, सार्वजनिक ठिकाण ४१६, खाजगी मालमत्तेवरील ४१, श्रीगोंदा मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार २९४, सार्वजनिक ठिकाण ८०२, खाजगी मालमत्तेवरील ३११ तर कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८२५, सार्वजनिक ठिकाणच्या ३६२ जाहिराती काढण्यात आल्या असल्याचे आचारसंहिता कक्षातर्फे कळविण्यात आले आहे.

## शहरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कारवाईची मोहीम सुरू

नगर - विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर शहर पोलिसांनी अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. कोतवाली व तोफखाना पोलिसांनी कारवाई करून तलवार, गावठी कट्टा व जिवंत काडतुसे, तसेच १ सत्तूर अशी शस्त्रे जप्त केली आहेत. या प्रकरणी संबंधीत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अंमलदार शिरीष तरटे यांच्या फिर्यादीवरून रियाज मुस्ताक सय्यद (वय ३०, रा. जुना बाजार, खिस्त गल्ली, अहिल्यानगर) याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्या ताब्यातून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार दत्तात्रय जपे, सुनील शिरसाठ, अहमद इनामदार, दत्तात्रय कोतकर, सतीष भवर, बाळासाहेब भापसे यांच्या पथकाने गुरूवारी (दि.१७) रात्री सव्वा नऊच्या सुमारास बालिकाश्रम रस्त्यावरील पंपींग स्टेशन जवळ ही कारवाई केली. अधिक तपास उपनिरीक्षक पाटील करत आहेत.

पोलीस अंमलदार सचिन लोळगे यांच्या फिर्यादीवरून करणसिंग रघुविरसिंग जुनी (वय २४, रा. संजयनगर, काटवण खंडोबा, अहिल्यानगर) याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्या ताब्यातून एक स्टिलची तलवार जप्त केली आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुरुवारी रात्री ८.४० वाजेच्या दरम्यान आयुर्वेद कॉलेज चौक, काटवण खंडोबाकडे जाणार्या रस्त्यावर ही कारवाई केली. अधिक तपास पोलीस अंमलदार राजेंद्र पालवे करत आहेत.

तर तिसरी कारवाई जुना मंगळवार बाजार परिसरात शुक्रवारी (दि.दि.१८) रात्री ८.१३ च्या सुमारास करण्यात आली. तेथे नामदेव शिंदे (रा. कोके चाळ, बुरूडगाव रोड) याला पकडण्यात आले. त्याच्या ताब्यातून धारदार लोखंडी सत्तूर जप्त करण्यात आला आहे. याबाबत पो.कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्याच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे २८ ऑक्टोबर रोजी आयोजन

नगर - कर्मचारी भविष्य निधी संघठन यांच्यामार्फत निवृत्ती वेतनधारक आणि कंपनी मालकांसाठी २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, काठवण खंडोबा रस्ता, अहिल्यानगर येथे 'निधी आपके निकट' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कर्मचारी भविष्य निधीबाबत अडचणी असलेल्या सदस्यांनी संबंधित कागदपत्रांसह कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त जिल्हा कार्यालय, अहमदनगर यांनी केले आहे.

